- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४८,७०० /-
✔ २३ कॅरेट : १,४६,३५० /-
✔ चांदी : २,३८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे



विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६



Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, २७ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२८ | किंमत : २ रूपये



सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# आता ई-२० जनता पार्टी मैदानात उतरणार




**वृत्तसंस्था, मुंबई**

'नीट' पेपरफुटी प्रकरणात 'कॉकरोच जनता पार्टीने' जंतर-मंतरवर केलेल्या ऐतिहासिक आंदोलनानंतर आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर देशातील तरुणाईचा राजकीय दबाव वाढताना दिसत आहे. सीजेपीच्या या अभूतपूर्व यशावरून प्रेरणा घेत आता 'ई-२० जनता पार्टी' नावाचा नवीन गट मैदानात उतरला आहे. पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला विरोध करत, वाहनधारकांना १०० टक्के शुद्ध पेट्रोल खरेदी करण्याचा कायदेशीर पर्याय उपलब्ध करून द्यावा, या मागणीसाठी उपोषण सुरू करण्यात येणार आहे.

ई-२० जनता पार्टीच्या सोशल मीडिया पेजची स्थापना झाल्यानंतर, इन्स्टाग्रामवर काहीच वेळात याचे फॉलोअर्सची संख्या लाखांच्या घरात पोहोचली आहे. त्यामुळे कॉकरोच जनता पार्टी प्रमाणे ई-२० जनता पाटीर्लाही मोठा पाठिंबा मिळताना दिसतोय. 'ई-२० जनता पार्टी'च्या संस्थापकांनी आणि आंदोलकांनी आरोप केला आहे की, सरकारच्या २० टक्के इथेनॉल मिश्रणामुळे जुन्या आणि नवीन वाहनांच्या इंजिनचे मोठे नुकसान होत आहे. वाहनांची मायलेज क्षमता कमालीची घटली असून, इंजिनमध्ये बिघाड होण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्राहकांना समान किंवा अधिक किंमत मोजूनही कमी दर्जाचे इंधन दिले जात असल्याचा दावा या पक्षाकडून करण्यात येत आहे.

## अशा आहेत मुख्य मागण्या

**१. १०० % शुद्ध पेट्रोलचा पर्याय :** पेट्रोल पंपांवर ग्राहकांना ई-२० ऐवजी १०० टक्के शुद्ध पेट्रोल निवडण्याचा स्पष्ट आणि कायदेशीर पर्याय उपलब्ध करून देण्यात यावा.

**२. किमतीत सवलत :** जर सरकार इथेनॉल मिश्रित इंधन विकत असेल, तर त्याचा उत्पादन खर्च कमी असल्याने ग्राहकांना ते स्वस्त दरात मिळाले पाहिजे.

**३. पारदर्शक लेबलिंग :** प्रत्येक इंधन पंपावर कोणत्या नोझलमध्ये किती टक्के इथेनॉल आहे, याचे स्पष्ट फलक लावले जावेत.

## आंदोलकांवरील गुन्हे खरोखरच रद्द होणार?

**नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीने सरकारसमोर मांडलेल्या तीन प्रमुख मागण्यांमध्ये आंदोलकांवर नोंदवलेले एफआयआर मागे घेण्याची मागणी केली आहे. पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना उपोषण सोडवण्यापूर्वी सरकारने त्यांना याविषयी आश्वासन दिल्याचे म्हटले जात आहे. दरम्यान, शनिवारी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. मात्र, गुन्हे मागे घेण्याबाबत दिल्ली पोलिसांना अद्याप केंद्र सरकारकडून कोणतेही अधिकृत निर्देश मिळालेले नाहीत. पोलिस सध्या शासनाकडून येणाऱ्या औपचारिक आदेशांची वाट पाहत आहेत. पोलिस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, २० जुलै रोजी झालेल्या तीव्र आंदोलनानंतर २२ जुलै रोजी हे गुन्हे दाखल करण्यात आले होते. या आंदोलकांविरोधात एकूण १५ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. या हिंसक चकमकीत १२९ पोलीस कर्मचारी जखमी झाले, ज्यात ११ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. याशिवाय ६० आंदोलकही जखमी झाले होते. कर्तव्य पथ पोलिस ठाण्यात एका पोलिस निरीक्षकाच्या तक्रारीवरून भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १०९ (१) अंतर्गत हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवला आहे.

# तेजप्रताप यादव यांना अटक



**वृत्तसंस्था, पाटना**

बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय जनता दलचे अध्यक्ष लालू प्रसाद यादव यांचे सुपुत्र, जनशक्ती जनता दलचे राष्ट्रीय अध्यक्ष तेजप्रताप यादव यांना अटक करण्यात आली आहे. एका मॉलमध्ये फिरत असताना तेजप्रताप यादव यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना रात्री उशीरा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने तेजप्रताप यादव यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

नीट युजी पेपर फुटी प्रकरणाविरोधात पाटण्यातील गांधी मैदानावर पुकारलेल्या आंदोलनादरम्यान तेजप्रताप यादव यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले होते, मात्र रात्री उशीरा एका मॉलमधून ताब्यात घेण्यात आले. न्यायालयने त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या अटकेच्या प्रक्रियेवर तेजप्रताप यादव यांच्या वकिलांनी गंभीर सवाल उपस्थित केले असून सोमवारी जामिनासाठी अर्ज दाखल करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

तेज प्रताप यादव यांचे वकील जगन्नाथ सिंह यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना पोलिसांच्या कारवाईवर तीव्र आक्षेप घेतला. २६ जुलै रोजी एफआयआर नोंदवण्यात आला, तर अटकेची कारवाई २५ जुलै रोजी संध्याकाळी ७.३० वाजताच सिटी सेंटर मॉलमधून करण्यात आली. मी न्यायाधीशांकडे त्यांच्या सुटकेसाठी अर्ज सादर केला होता. परंतु न्यायालयाने सोमवारी जामीन अर्ज सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, मी नौबतपूर पोलिस ठाण्यात पोहोचलो तेव्हा तिथे दोन एसपी उपस्थित होते. मी अटकेचे कारण विचारले असता योग्य उत्तर मिळाले नाही. २५ जुलैच्या संध्याकाळपासून तेज प्रताप पोलिसांच्या ताब्यात आहेत, हे त्यांच्या कुटुंबालाही ठाऊक नव्हते. तसेच आम्हाला अजूनही एफआयआरची प्रत मिळालेली नाही.

### थोडक्यात

## पंजाब हादरवण्याचा कट उधळला

**जालंधर :** पंजाब पोलिसांनी पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआयद्वारे चालवल्या जाणाऱ्या एका दहशतवादी मॉड्यूलचा पदार्फाश केला आहे. सीमेपलीकडून चालवल्या जाणाऱ्या दहशतवादाच्या नेटवर्क विरोधात कारवाई करत, काउंटर इंटेलिजन्स जालंधर आणि जालंधर ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त पथकाने बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) शी संबंधित एका दहशतवाद्याला अटक केली आहे. पोलिसांनी जालंधरमधून या दहशतवाद्याला पकडले आहे, ज्याच्याकडून मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. पोलिस अधिकाऱ्यांनुसार, हे दहशतवादी मॉड्यूल परदेशात बसलेल्या त्यांच्या हँडलर्सच्या इशाऱ्यावर काम करत होते. आरोपीकडून १.३ किलोग्राम उच्च स्फोटकांनी भरलेले एक इम्प्रोव्हाइज्ड एक्सप्लोसिव्ह डिव्हाइस मिळाले आहे. दहशतवाद्याची ओळख अद्याप उघड करण्यात आलेली नाही. पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांच्या मते, या कएऊ मध्ये लोखंडी गोळ्या आणि बॉल बेअरिंग्ज देखील पॅक केले होते. स्फोटकांच्या रचनेवरून आणि प्रमाणावरून हे स्पष्ट होते की दहशतवादी पंजाबमध्ये हल्ल्याचा कट रचत होते. वेळेत केलेल्या या कारवाईमुळे राज्याची शांतता भंग करण्याचा एक मोठा कट उधळला गेला आहे आणि डझनभर निरपराध लोकांचे प्राण वाचले आहेत.

## पेपरफुटी रोखण्यासाठी टास्क फोर्स

**नवी दिल्ली :** अभिजीत दिपके यांच्या नेतृत्वात नवी दिल्ली येथील जंतर मंतरवर झालेल्या विद्यार्थी आंदोलनाला देशभर अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्यानंतर काल केंद्र सरकारने नमती भूमिका घेतली आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. याचदरम्यान आंदोलन काळात विद्यार्थ्यांवर झालेल्या निष्ठूर लाठीचार्जमुळे सर्वच स्तरातून संताप व्यक्त केला. आता डॅमेज कण्ट्रोलसाठी पंतप्रधान मोदी पुढे सरसावले असून आज त्यांनी परीक्षा प्रणालीत आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी इन्फोसिसचे सहसंस्थापक नंदन निलकेणी यांच्या नेतृत्वात टास्क फोर्सची स्थापना केली.

नीट पेपरफुटीच्या प्रकरणानंतर आता केंद्र सरकार ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे. नीट पेपरफुटीवरून नॅशनल टेस्टिंग एजन्सीवर मोठी टीका केली होती. त्यानंतर केंद्राने नॅशनल टेस्टिंग एजन्सीमधील तब्बल ४७ अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ केले. तसेच आता पेपरफुटीविरोधी सुधारणा विधेयकही संसदेत मांडले जाणार असून, यासंदर्भात आता कडक कायदा केला जाणार आहे. नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले की, फ्रेंण्ड्सङ्कविद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी भारत सरकार अनेक पाऊले उचलत आहे. जे लोक विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळले, ते तुरुंगात सडत आहेत.

# रशिया-युक्रेन युद्धाचा पुन्हा भडका



**वृत्तसंस्था, मॉस्को**

रशिया-युक्रेन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, काळ्या समुद्रात व्यापारी जहाजांवरील हल्ले अजूनही सुरू आहेत. शनिवारी २५ जुलै रोजी युक्रेनच्या ओडेसा या प्रमुख बंदर शहरात एमव्ही एजीएन रॅग्नर या आणखी एका व्यापारी जहाजावर हल्ला झाला. जहाजावर चार भारतीय नागरिक होते. कीवमधील भारतीय दूतावासाने रविवारी एक निवेदन जारी करून चारपैकी दोघे भारतीय नागरिक सुरक्षित असल्याची पुष्टी केली आहे, तर उर्वरित दोन बेपत्ता भारतीय कर्मचाऱ्यांचा शोध घेण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. युक्रेनमधील भारतीय दूतावासाने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करून म्हटले आहे की २५ जुलै रोजी ओडेसा बंदरात एमव्ही एजीएन रॅग्नर या व्यापारी जहाजावर झालेल्या हल्ल्यानंतर भारतीय दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. जहाजावर चार भारतीय नागरिक होते. ताज्या माहितीनुसार, दोन भारतीय सुरक्षित असून इतर दोघांविषयी माहिती गोळा केली जात आहे. शोध आणि बचाव कार्य सुरू असून, दूतावास स्थानिक अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. दूतावासाने एक आपत्कालीन फोन नंबर (+३८०९३३५५९९५८) देखील जारी केला आहे. काही दिवसांपूर्वीच, १९ जुलै रोजी, ओडेसा बंदरातून निघत असलेल्या एमव्ही गोल्डन लिओ या मालवाहू जहाजावर झालेल्या हल्ल्यात चार भारतीय खलाशी ठार झाले होते. त्या घटनेनंतर भारताने आक्षेप नोंदवला होता आणि एका वरिष्ठ रशियन राजनैतिक अधिकाऱ्याला बोलावून घेतले होते.

**परराष्ट्र मंत्रालयाने सूचना जारी केली**

काळा समुद्रात जहाजांवर सुरू असलेल्या हल्ल्यांमध्ये आतापर्यंत किमान पाच भारतीय नागरिकांनी आपले प्राण गमावले आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने या प्रदेशात कार्यरत असलेल्या सर्व भारतीय खलाशी आणि व्यापारी नौदल कर्मचाऱ्यांसाठी एक सुरक्षा सूचना जारी केली आहे. एप्रिल महिन्यापासून काळ्या समुद्रातील व्यापारी जहाजांवर होणाऱ्या क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. या धोकादायक सागरी मार्गावरून प्रवास करणाऱ्या जहाजांनी सतर्क राहणे आवश्यक आहे, हा इशारा परराष्ट्र मंत्रालयाने दिला आहे.




संपादकीय लेखणीतून...

# फुटपाथवरील अतिक्रमण गंभीर समस्या

राज्यासह देशात अतिक्रमण हटविण्याची मोहीम मोठ्या प्रमाणात सुरू याचे स्वागतच. परंतु मोठमोठ्या व्यावसायिकांनी (दुकानदार, खाजगी दवाखाने, कोचिंग क्लासेस,अवैध प्रवासी वाहतूक)इत्यादी अनेक क्षेत्रातील व्यावसायिकांनी फुटपाथवर अतिक्रमण करून आपली पकड मजबूत केल्याचे दिसून येते. सरकारने बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरातील अवैध वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे.परंतु बसस्थानकाच्या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक का होते याचा विचार सरकारने कधी केला का? सरकारने टाईम-टू-टाईम बस सोंडेने, प्रवाशांची गैरसोय दूर करणे, प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसेसची संख्या वाढविणे यावर जर सरकारने नियंत्रण ठेवले असते तर अवैध प्रवासी वाहतूक बसस्थानकाच्या परिसरात दिसलीच नसती व एसटी महामंडळ संकटात सापडले नसते.परंतु सरकारचे लक्ष प्रवाशांकडे नसल्याने ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.सरकार प्रवाशांना पाहिजे त्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देत नसल्याने अवैध प्रवासी वाहतूकीची परिस्थिती निर्माण झाली आहे.

राज्यातील अनेक भागात घंटोनघंटे बस वेळेवर पोहचत नाही यामुळे प्रवाशांची गैरसोय होते अशा परिस्थितीत प्रवासी खाजगी वाहतूकीकडे वळतांना दिसतात.त्यामुळेच आज एसटी महामंडळ संकटात सापडली आहे आणि त्याचे प्रायश्चित्त आज गोरगरीब,सर्वसामान्य व ग्रामीण प्रवाशांना भोगावे लागत आहेत याला एसटी महामंडळ व सरकार जबाबदार आहे.अशाचप्रकारे सरकारी आरोग्य सुविधा दिवसेंदिवस ढासळत असल्याने त्यांच्या आसपास खाजगी दवाखान्याचा भरमाड वाढला आहे अशा परिस्थितीत यांनी सुद्धा फुटपाथवर अतिक्रमण करून आपली पकड मजबूत करून पार्किंगसाठी वापर आहे आणि याचे प्रायश्चित्त सर्वसामान्यांना भोगावे लागत आहेत.त्याचप्रमाणे सध्याच्या परिस्थितीत अवैध प्रवासी वाहतूकदारांनी सुध्दा फुटपाथवर आपली पकड मजबूत केल्याचे दिसून येते.आपण पहातो की,राज्यातील बहुतांश शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणे, बसस्थानके,रेल्वे स्थानके, कोचिंग क्लासेस व दुकानदार यांच्याकडून फुटपाथवर अतिक्रमण करून दुरूपयोग करतांना दिसतात.याला जबाबदार स्थानिक प्रशासन व सरकार आहे आणि ह्या सर्व घटना सरकार, प्रशासन, स्थानिक प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे .फुटपाथ म्हणजे पादचाऱ्यांनी पायी चालण्याची जागा असते.परंतु सध्याच्या परिस्थितीत राज्यातील अनेक शहरांमध्ये जनुकाय व्यावसायिकांनी फुटपाथवर आपलीं मालकी केली की काय असे चित्र राज्यात सर्वत्रच दिसून येते. वाढते ट्राफीक,वाढती पार्किंगची समस्या आणि फुटपाथवर अवैध व्यवसाय यामुळे पायदळ चालणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते व याचा परिणाम दुर्घटनेमध्ये होतो हे आपण अनेकदा मिडियाच्या व वर्तमानपत्राच्या माध्यमातून पाहिले आहे.

फुटपाथवरुन पादचारी चालु शकत नाही,कारण तिथे दुकाने लागली असतात, वाढत्या ट्राफीकमुळे रस्त्यांनी मोठी गर्दी असते या सर्व अडचणींमध्ये पायदळ चालणारे आबालवृद्ध, विद्यार्थी व सर्वसामान्य अडकतात अशा परिस्थितीत सर्वांनाच घरी जाण्याची घाई असते.अशा कठीण परिस्थितीत मोठ्या प्रमाणात दुर्घटना सुध्दा ओढावू शकते आणि दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत.अनेकदा पायदळ चालणाऱ्यांना मागून एखादे वाहन येते आणि दुर्घटना करून निघून जाते. यात दोषी कोण पायदळ चालणारे म्हणावे की वाहन चालविणारे ! माज्यामते यात मुख्य दोषी म्हणजे स्थानिक प्रशासन व सरकार आहे .कारण फुटपाथचा योग्य आणि सटीक उपयोग जर झाला तर आणि फुटपाथ पायदळ चालणाऱ्यांसाठी मोकळी केली तर पायदळ चालणाऱ्यांच्या ९५ टक्के दुर्घटना आपोआप थांबेल. प्रशासन वाहन चालकांचे लायसन्स किंवा हेल्मेट विचारतात मग पायदळ चालणाऱ्यांना फुटपाथवर चालण्याचे का सांगत नाही किंवा का विचारत नाही !कारण फुटपाथवर व्यावसायिकांनी पुर्णपणे अतिक्रमण केले असते.त्यामुळे सरकारने, प्रशासनाने व स्थानिक प्रशासन पायदळ चालणाऱ्यांच्या वाढत्या दुर्घटना पहाता संपूर्ण नागरिकांसाठी राज्यातील संपूर्ण शहरातील फुटपाथ मोकळी केली पाहिजे,असे माझे स्पष्ट मत आहे. मागील वर्षी एक भयावह आणि अंगावर शहारे येणारी घटना घडली. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी मार्गावरील काटली गावानजीक अल्पवयीन सहा मुले पहाटे ५.३० च्या दरम्यान मॉर्निंग वॉकला निघाली असता अचानक भरधाव मालवाहू ट्रकने ६ मुलांना चिरडले यात ४ मुलांचा वेदनादायक मृत्यू झाला व दोन गंभीर जखमी झाले होते.यावरून आपण समजू शकतो की पायदळ किंवा मॉर्निंग वॉक करने सुरक्षित नाही म्हणजेच घराच्या बाहेर निघतांना जीव मुठीत घेऊन निघावे लागते. फुटपाथवर चालनारा असो अथवा रोडच्या कडेला चालनारे असो यांना सुध्दा दुर्घटनेने सोडले नाही.

# विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा हा विजय शिक्षण व्यवस्थेतील सकारात्मक बदलाचे प्रतीक

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दिल्लीत नीट युजी परीक्षा अनियमितता आणि शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींवरून सुरू असलेल्या तीव्र देशव्यापी विद्यार्थी आंदोलनापुढे केंद्र सरकारला अखेर झुकावे लागले आहे. या वाढत्या दबावामुळे केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सुपूर्द केला आहे.गेल्या ३५ दिवसांपासून दिल्लीच्या जंतर-मंतरवर आणि देशातील विविध शहरांत विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरू होते, ज्याला हे मोठे यश मिळाले आहे.हा ऐतिहासिक विजय विद्यार्थ्यांच्या एकजुटीची आणि न्याय्य मागण्यांची ताकद दर्शवतो. शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि विश्वासार्हता आणण्यासाठी हा लढा अत्यंत महत्त्वाचा होता.

कॉकरोच जनता पार्टी' आणि हजारो विद्यार्थ्यांमार्फत दिल्लीच्या जंतर-मंतरवर सलग अनेक आठवडे धरणे व तीव्र आंदोलन सुरू होते. हे आंदोलन दिल्लीसह मुंबई, लखनौ, पटना आणि इतर प्रमुख शहरांमध्ये पसरले, ज्याला विविध विरोधी पक्षांनीही जाहीर पाठिंबा दर्शवला.

संसदेच्या अधिवेशनातही विरोधी पक्षांनी या मुद्द्यावरून सरकारला धारेवर धरले होते आणि राहुल गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी रस्त्यावर उतरून विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला होता. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, परीक्षांमधील पेपरफुटी व अनियमितता थांबवणे, आणि आंदोलक विद्यार्थ्यांवरील बळाचा वापर थांबवून कारवाई करण्याची मागणी सतत लावून धरल्याने शेवटी सरकारला विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या. शिक्षण व्यवस्थेतील उत्तरदायित्व, परीक्षा पद्धतीमधील सुधारणा आणि पेपरफुटी रोखण्यासाठी कठोर कायदे व्हावेत, या प्रमुख मागण्यांसाठी हे ऐतिहासिक आंदोलन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या लढ्याला



मिळालेला हा एक मोठा ऐतिहासिक विजय मानला जात आहे.शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, परीक्षांमधील सुधारणा आणि पेपरफुटीविरोधात कठोर कायदे व जलदगती न्यायालयांच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी देशपातळीवर आणि संसद मार्चसारखे ऐतिहासिक आंदोलन केले. हा लढा विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा व उज्ज्वल भविष्याचा ऐतिहासिक विजय मानला जात आहे. हा विजय केवळ एका आंदोलनाचा नसून, येणाऱ्या पिढ्यांसाठी एक सुरक्षित आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षण व्यवस्था निर्माण करण्याच्या दिशेने पडलेले एक मोठे पाऊल आहे.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा हा विजय शिक्षण व्यवस्थेतील सकारात्मक बदलाचे प्रतीक मानला जाऊ शकतो. जेव्हा विद्यार्थी आपल्या हक्कांवर, सुविधांवर किंवा शैक्षणिक धोरणांवर एकत्र येऊन आवाज उठवतात आणि त्यात यशस्वी होतात, तेव्हा त्याचे दूरगामी परिणाम व्यवस्थेवर होतात.

विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा हा विजय शिक्षण व्यवस्थेतील सकारात्मक बदलाचे प्रतीक आहे. या विजयामुळे भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.गुणवान विद्यार्थ्यांना योग्य न्याय मिळण्याची खात्री वाढली आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी कडक नियम लागू होण्यास मदत मिळते. प्रवेश आणि परीक्षा प्रक्रियेतील ढिसाळपणा कमी होऊन पारदर्शकता येते. संघर्षाच्या आणि एकत्र येण्याच्या शक्तीची जाणीव तरुण पिढीला होते.

आंदोलन हे दर्शवते की तरुण पिढी आपल्या हक्कांबद्दल जागृत आहे. शांततापूर्ण आंदोलनांमुळे प्रशासन आणि विद्यार्थी यांच्यात संवादाची नवी दारेउघडतात. आंदोलनाच्या यशामुळे जुनाट किंवा त्रुटी असलेल्या नियमांमध्ये सुधारणा करणे प्रशासनाला भाग पडते.परीक्षा पद्धती, शुल्क रचना किंवा निकालांमधील पारदर्शकता वाढवण्यासाठी अशा विजयांचा मोठा वाटा असतो. हा विजय सिद्ध करतो की शिक्षण व्यवस्था केवळ प्रशासकांच्या निर्णयांवर नाही, तर विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार चालली पाहिजे. यामुळे भविष्यात विद्यार्थी अन्यायाविरुद्ध किंवा चुकीच्या गोष्टींविरुद्ध विधायक मार्गाने दाद मागण्यास प्रेरित होतात.

– ९५६१५९४३०६

# भारत-झिंबाब्वे दुसरा टि-२० सामना

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

**ईशान - तिलकच्या जोरदार फटकेबाजीने भारताची सरशी**

दुसऱ्या टी२० सामन्यात भारताने झिम्बाब्वेला ९० धावांनी पराभूत करून तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत पाच गडी गमावून २१९ धावा केल्या. प्रत्युत्तरात, झिम्बाब्वेचा संघ १७.५ षटकांत १२९ धावांवर सर्वबाद झाला. लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची फलंदाजी खराब झाली आणि संघ कधीही आरामदायक स्थितीत दिसला नाही. झिम्बाब्वेने नियमित अंतराने विकेट गमावल्या. मालिकेतील तिसरा आणि अंतिम टी२० सामना रविवारी खेळला जाईल.

**श्रेयसला मिळाला दिलासा**

श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदी भारताने प्रथमच टी२० मालिका जिंकली आहे. सूर्यकुमार यादवच्या जागी टी२० कर्णधार बनलेल्या श्रेयसची सुरुवात खराब झाली होती. श्रेयसच्या कर्णधारपदी भारताने आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्ध मालिका गमावल्या होत्या. कर्णधार म्हणून श्रेयसला आपल्या पहिल्या सात सामन्यांमध्ये विजय मिळवता आला नाही, पण झिम्बाब्वे दौऱ्यादरम्यान त्याला काहीसा दिलासा मिळाला. भारताने या मालिकेतील दोन्ही सामने जिंकून मालिका आपल्या नावावर केली आहे.

**झिम्बाब्वेची फलंदाजी खराब होती**

लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची फलंदाजी अत्यंत खराब झाली. पॉवरप्लेमध्ये झिम्बाब्वेने तीन विकेट गमावल्या आणि त्यांना सावरता आले नाही. झिम्बाब्वेसाठी ब्रायन बेनेटने सर्वाधिक ३२ धावा केल्या. ताडीवानाशे मारुमानीनेही २४, रायन बर्लने २० आणि ब्रॅड इव्हान्सने १९ धावा केल्या. भारतासाठी



अभिषेक शर्माने सर्वाधिक तीन बळी घेतले, तर पदार्पण करणाऱ्या यश ठाकूर आणि प्रिन्स यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. रवी बिश्नोई, शिवम दुबे आ तिलक वर्मा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

**ईशान आणि टिळक यांनी आपली ताकद दाखवली**

यापूर्वी, झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ईशान किशन आणि तिलक वर्मा यांच्या अर्धशतकांच्या जोरावर भारताने झिम्बाब्वेसमोर एक आव्हानात्मक लक्ष्य ठेवले. भारतीय संघाने २९ धावांवर दोन गडी गमावले होते. ईशानने टिळकसोबत भागीदारी करण्यापूर्वी, त्याने आणि कर्णधार श्रेयस अय्यरने तिसऱ्या विकेटसाठी ६६ धावा जोडल्या होत्या. त्यानंतर ईशान आणि तिलकने चौथ्या विकेटसाठी ९४ धावांची भागीदारी केली. ईशानने ४४ चेंडूंमध्ये नऊ चौकार आणि दोन षटकारांसह ८१ धावा करून सर्वाधिक धावा केल्या. तिलक २९ चेंडूंमध्ये पाच चौकार आणि तीन षटकारांसह ६० धावांवर नाबाद राहिला. भारताकडून श्रेयसने २५, वैभव सूर्यवंशीने २०, रिंकू सिंगने १२ आणि अभिषेक शर्माने आठ धावा केल्या. शिवम दुबे सहा धावांवर नाबाद राहिला. झिम्बाब्वेकडून ब्लेसिंग मुझारबानी, रिचर्ड नगारवा, ब्रॅड इव्हान्स, न्यूमन न्यामहुरी आणि ब्रायन बेनेट यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

**भारताच्या नावावर एक अनोखा विक्रम**

भारतीय संने एका कॅलेंडर वर्षात नवव्यांदा टी-२० क्रिकेटमध्ये २००+ धावांचा टप्पा गाठला आहे. यासह, भारताने एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक टी-२० आंतरराष्ट्रीय धावा करण्याचा स्वतःचाच विक्रम बरोबरीत आणला आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये भारतीय संघाने नऊ वेळा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये २००+ धावांचा टप्पा गाठला होता. २०२३ मध्ये भारताने सात वेळा ही कामगिरी केली होती.

**२०२४ मध्ये नऊ वेळा २००+ धावा**

यापूर्वी, टीम इंडियाने २०२४ मध्ये नऊ वेळा टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २००+ धावांचा टप्पा गाठला होता. भारताने २०२३ मध्ये सात वेळा ही कामगिरी केली होती. जपान (२०२४) आणि ऑस्ट्रिया (२०२५) यांनी प्रत्येकी सात वेळा ही कामगिरी केली आहे. इंग्लंड (२०२२), दक्षिण आफ्रिका (२०२२) आणि वेस्ट इंडिज (२०२४) यांनी प्रत्येकी सहा वेळा ही कामगिरी केली आहे. तथापि, भारताने एका कॅलेंडर वर्षात नऊ वेळा २००+ धावा दोनदा केल्या आहेत.

**यश ठाकूरचे पदार्पण**

भारताने या सामन्यासाठी प्लेइंग इलेव्हनमध्ये एक बदल केला, अशोक शर्माच्या जागी यश ठाकूरला संधी दिली. हा सामना यशचे टी२० आंतरराष्ट्रीय पदार्पण होता. या सामन्यादरम्यान यशने दोन बळीही मिळविले. यश ठाकूरने ब्रायन बेनेटला बाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले. पदार्पणाच्या सामन्यात घेतलेला हा यशचा पहिला टी२० आंतरराष्ट्रीय बळी होता. सलग दुसऱ्या दिवशी होणारा तिसरा सामना जिंकन टिम इंडियाला क्लिन स्विप करण्याची नामी संधी आहे. तसे झाले तर श्रेयस अय्यरच्या कर्णधारपदाला कोणाचाही आक्षेप असणार नाही.

– ९०९६३७२०८२

# मोकाट जनावरांवर आपली आस्था असतांना, शहरात ते वाऱ्यावर का?

रमेश लांजेवार
नागपूर

आपण पाहतो ही, राज्यातील अनेक शहरांमध्ये गुरेढोरे लावारीस मोकाट फिरतांना दिसतात किंवा रस्त्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या दिसून येतो.यामुळे वाहनचालकांचा किंवा जनावरांचा अपघात होऊन जीव धोक्यात येऊ शकतो आणि अशा अनेक दुर्घटना झाल्या सुध्दा आहेत व ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. तरीही सरकार किंवा प्रशासन याकडे जातीने लक्ष देत नाही हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गायीला अत्यंत मोलाचे आणि महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे तीला गोमाता म्हणून संबोधले जाते.परंतु आज मोठ्या प्रमाणात गायी (गुरेढोरे) रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर किंवा मुलांच्या खेळण्याच्या ग्राऊंडमध्ये बसलेले दिसतात आणि आपल्या आहारासाठी व विसाव्यासाठी भटकत असतात. त्याचप्रमाणे गायी जेव्हा रस्त्यावर किंवा वस्तीमध्ये फिरतात तेव्हा त्यांचा झुंड कचऱ्याच्या ढिगाऱ्याकडे जातांना जास्त दिसते कारण त्यांना आशा असते की, इथे मला काही तरी नक्कीच खायला मिळेल परंतु याठिकाणी त्यांच्या दृष्टीने संपूर्ण विषेली पदार्थ असतात.अशा परिस्थितीत गुरेढोरे विषारी वस्तू खातात, ज्या त्यांच्या शरीराला



घातक असतात.

उदाहरण द्यायचे झाले तर,प्लास्टिक,कपडा किंवा प्लॅस्टिकमध्ये इंजेक्शन किंवा ब्लेड किंवा विषेली पदार्थ सुद्धा असू शकतात;त्या जर त्यांच्या पोटात चुकीने गेल्या तर त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.अशा परिस्थितीत मनपा प्रशासन व नगरसेवकांचे दायित्व असते की,गोरक्षाच्या माध्यमातून प्रत्येक जनावरांचा जीव वाचविला पाहिजे.परंतु त्यांची रक्षा न करता त्यांना वाऱ्यावर सोडल्याचे चित्र नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये मोकाट फिरणाऱ्या गुराढोरांवरून लक्षात येते.

उदाहरण द्यायचे झाले तर,नागपूर येथील प्रभाग क्रमांक ३१ मध्ये राजीव गांधी पार्क या ठिकाणी बास्केट बॉल ग्राउंड आहे. परंतु या ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात गुरेढोरे जमा होतात. अशा परिस्थितीत ते आपसात भिडतात व त्यांची टक्कर होते अशा परिस्थितीत बास्केटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंचा अपघात होऊ शकतो. या संपूर्ण बाबींचा विचार करून मनपा प्रशासनाने आणि नगरसेवकांनी यावर तोडगा काढुन गुराढोरांसाठी योग्य जागा उपलब्ध करावी किंवा मोकाट जनावरांना गोशाळेत स्थान द्यावे.कारण गुरेढोरे रस्त्याच्या कडेला किंवा रस्त्यावर बसले असतात तेव्हा त्यांचा किंवा मानवी अपघात सुध्दा होऊ शकतो यालाही नाकारता येत नाही.याकरीता मोकाट फिरणाऱ्या जनावरांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने पुर्वनीयोजीत उपाययोजना करणे गरजेचे आहे. मोकाट जनावरांचा सर्वसामान्यांना त्रास नाहीच परंतु त्यांच्या खानपानात विषेली वस्तू जाने किंवा कळतनकळत रस्त्यावर बसलेल्या जनावरांचा किंवा मानवी अपघात होणे ही दुःख बाब आहे. त्यामुळे नागपूर शहरात असो अथवा राज्यातील इतर शहरात असो मोकाट गुराढोरांची व्यवस्था गोशाळेत व्हायला पाहिजे हे प्रशासनाचे दायित्व आहे. मुसळधार पाऊस,निसरडे रस्ते, रस्त्यावरील खड्डे,कमी झालेली दृश्यमानता आणि त्यातच अचानक समोर येणारे मोकाट जनावरे नागपूरकर वाहनचालकांसाठी हा अनुभव रोजचाच झाला आहे आणि हिच स्थिती राज्यातील अनेक शहरांमध्ये असु शकते. अशाप्रकारे पावसाळ्यात रस्त्यावर वाढलेल्या मोकाट जनावरांच्या वावरामुळे अपघातांचा धोका वाढला आहे.

नागपूरसह राज्यातील अनेक शहरांमध्ये वर्षागणिक मोकाट जनावरांचा प्रश्न अधिक गंभीर होत असल्याचे दिसून येते. यामुळे पावसाळ्यात संभाव्य अपघात टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरांना योग्य स्थान देऊन त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले पाहिजे, तसेच निष्काळजी पशुपालकांवर कारवाई करून शहरातील प्रमुख रस्ते, मुलांचे खेळण्याचे ग्राउंड सुरक्षित करावेत.मोकाट जनावरांचा किंवा मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या मानवी दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्याची नितांत आवश्यकता आहे. यामुळे मोकाट जनावरांची रहाण्याची, खानपानची योग्य सुविधा होईल व अपघातावर आळा बसेल. जय हिंद!

– ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# "जनसेवा सप्ताह" अंतर्गत प्रगतशील शेतकरी व महिला शेतकऱ्यांचा 'मा. अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार' देऊन गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त,**
**सालेकसा- राजू फुंडे**

महाराष्ट्र राज्याचे लोकनेते तथा लोकप्रिय उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजित "जनसेवा सप्ताह" अंतर्गत पाचव्या दिवशी, रविवार (दि. २६ जुलै २०२६) रोजी सालेकसा तालुक्यातील प्रगतशील, प्रयोगशील व सेंद्रिय शेतीमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी व महिला शेतकऱ्यांचा "मा. अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार" देऊन गौरव करण्यात आला.

हा कार्यक्रम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुलभाई पटेल व खासदार राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राज्य सरचिटणीस (ओबीसी आघाडी) प्रभाकर दोनोडे, तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे आणि जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

**लटोरी येथे महिला शेतकरींचा गौरव**

सकाळी ९ वाजता लटोरी येथे सेंद्रिय शेती, शेतीपूरक व्यवसाय व नाविन्यपूर्ण प्रयोगांच्या माध्यमातून शेतीची आर्थिक उन्नती साधणाऱ्या प्रगतशील महिला शेतकरी श्रीमती रेवंतीबाई किसन मोहारे यांना "मा. अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार" प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांचा प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. हिरालाल साठवणे, ज्येष्ठ कार्यकर्ते विनोद अग्रवाल, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष विजय मानकर, शहराध्यक्ष



ब्रजभूषण बैस, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, ग्रामपंचायत सदस्य अमित अग्रवाल, राकेश रत्नाकर, किशन मोहारे, ऋषी बैस यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

**गांधीटोला येथे तुकाराम बोहरे यांचा सत्कार**

सकाळी १० वाजता गांधीटोला येथे सेंद्रिय शेती व संशोधनात्मक शेती पद्धतीद्वारे तालुक्यात वेगळी ओळख निर्माण करणारे प्रगतशील शेतकरी श्री तुकारामजी बोहरे यांचा प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी तालुकाध्यक्ष डॉ. अजय उमाटे, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष राजुभाऊ डोंगरे, शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र बडोले, ऋषी बैस आदी मान्यवर उपस्थित होते.

**सातगाव येथे सुरेश बोहरे यांना कृषी सन्मान**

सकाळी ११ वाजता सातगाव येथे सेंद्रिय व झिरो बजेट शेती, दुग्ध उत्पादन आणि रोजगार निर्मितीमध्ये उल्लेखनीय योगदान देणारे प्रगतशील शेतकरी सुरेश गोविंदराव बोहरे यांना "मा. अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार" प्रदान करण्यात आला. त्यांचा प्रशस्तीपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास डॉ. अजय उमाटे, डॉ. हिरालाल साठवणे, ब्रजभूषण बैस, बाजीराव तरोने, राजुभाऊ डोंगरे, जितेंद्र बडोले, श्री. कावरे, ऋषी बैस तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रगतशील शेतकऱ्यांनी केलेले नाविन्यपूर्ण प्रयोग हे इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी असून आधुनिक, सेंद्रिय व पर्यावरणपूरक शेतीचा प्रसार करण्यासाठी अशा शेतकऱ्यांचा सन्मान होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

# पालकमंत्री बावनकुळे यांचा गावभेट

## समस्यांबाबत कार्यवाहीचे निर्देश



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी मौदा तालुक्यातील धामणगाव, कुंभारी, मारोडी, बोरगाव, मोहाडी, गोवरी आणि चिरव्हा या गावांचा दौरा करून ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी नागरिकांच्या विविध समस्या, अडचणी आणि विकाससंदर्भातील मागण्या जाणून घेत त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. गावभेटीदरम्यान ग्रामस्थांनी पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, शिक्षण, महसूल विभागाशी संबंधित प्रश्नांसह विविध समस्या पालकमंत्र्यांसमोर मांडल्या. प्रत्येक मागणीची गांभीर्याने दखल घेत शासन नागरिकांच्या अपेक्षांनुसार विकासकामांना गती देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. तसेच नागरिकांच्या प्रश्नांचे वेळेत निराकरण करण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी गावांमध्ये सुरू असलेल्या अवैध दारू विक्री, जुगार, सट्टा आणि इतर अवैध व्यवसायांबाबत नागरिकांनी तक्रारी केल्या. त्याची गंभीर दखल घेत पालकमंत्री बावनकुळे यांनी पोलीस विभागाला कठोर शब्दांत फटकारत अशा अवैध धंद्यांवर तात्काळ प्रभावी कारवाई करण्याचे आदेश दिले. अनेक गावांमध्ये पटवारी, डॉक्टर आणि शिक्षक मुख्यालयी राहत नसल्याच्या तक्रारीही ग्रामस्थांनी मांडल्या. यावर नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांची कानउघाडणी करून त्यांनी नियमित उपस्थिती सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले. दरम्यान, यंदा कमी पावसामुळे धान उत्पादक शेतकरी अडचणीत असल्याचे लक्षात आणून देण्यात आले. त्यावर लवकरच पेज धरणाचे पाणी कालव्यातून सोडण्यात येणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी ग्रामस्थांना दिली. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. या दौऱ्यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर, माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी, मौदा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष प्रसन्ना तिडके, भाजप जिल्हा उपाध्यक्ष नरेश मोटघरे, तालुका मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, मुकेश अग्रवाल, मुन्ना चलसानी, मोरेश्वर सोरते, रमेश कुंभरकर, डॉ. नीलिमाताई घाटोळे, संकेत झाडे, वीरेंद्र पायतोडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध शासकीय विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोठीटोला येथे मलेरिया प्रतिबंधासाठी सामूहिक सर्वेक्षण; नागरिकांना जनजागृती

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे :** सालेकसा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा अंतर्गत उपकेंद्र नवाटोला येथील कोठीटोला गावात रविवार, दि. २६ जुलै २०२६ रोजी मलेरिया प्रतिबंध व नियंत्रणासाठी मास सर्वेक्षण करण्यात आले.

या सर्वेक्षणादरम्यान गावातील नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच मलेरिया प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत



जनजागृती करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. पारस गिरी, उपसरपंच, आरोग्य सेवक, आशा वर्कर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र दरेकसा येथील आरोग्य पथक उपस्थित होते. आरोग्य विभागाने नागरिकांना मलेरिया टाळण्यासाठी पुढील उपायांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. रात्री झोपताना नियमितपणे मच्छरदाणीचा वापर करावा. घराच्या परिसरात कुठेही पाणी साचू देऊ नये, कारण साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होते.

संध्याकाळच्या वेळी बाहेर पडताना पूर्ण बाह्यांचे कपडे व पॅंट परिधान करावेत. घरात डास प्रतिबंधक कॉईल, लिक्विड किंवा फवारणीचा वापर करावा. अचानक ताप, थंडी वाजणे, उलटी किंवा अशक्तपणा जाणवल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्रात जाऊन रक्त तपासणी करून उपचार घ्यावेत. यावेळी आरोग्य विभागाने नागरिकांना "स्वच्छता + काळजी = मलेरियापासून मुक्ती" हा संदेश देत प्रत्येकाने आपल्या परिसराची स्वच्छता राखून मलेरियाविरोधी मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

# मौदा तालुक्यासाठी आनंदाची बातमी: जि. प. हायस्कूल कोदामेंढी येथे 'एलिमेंटरी व इंटरमिडिएट' चित्रकला परीक्षा केंद्र मंजूर!

## गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या अथक पाठपुराव्याला यश, तालुक्यातील विद्यार्थ्यांना बाहेर जाण्याच्या त्रासातून मुक्ती, अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

तालुक्यातील कलाप्रेमी आणि गुणवंत विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंदाची व अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. शासकीय 'एलिमेंटरी' व 'इंटरमिडिएट' चित्रकला परीक्षेसाठी मौदा तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल कोदामेंढी येथे नवीन परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे. तालुक्यातील शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे केंद्र मिळण्यात यश आले आहे.

यापूर्वी मौदा तालुक्यात या परीक्षेचे केंद्र उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना नागपूर किंवा लगतच्या इतर तालुक्यांमध्ये परीक्षेसाठी जावे लागत होते. लांबचा प्रवास आणि आर्थिक भुर्दंड यामुळे तालुक्यातील अनेक पात्र व गुणवंत विद्यार्थी या महत्त्वाच्या परीक्षेपासून वंचित राहत होते. ही अडचण लक्षात घेऊन गटशिक्षणाधिकारी कार्यालयातर्फे वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळून तालुक्यात पहिल्यांदाच चित्रकला परीक्षेचे स्वतंत्र केंद्र प्राप्त झाले आहे, ही शिक्षण विभागासाठी अत्यंत भूषणावह बाब ठरली आहे.

**बाह्य विद्यार्थ्यांनाही मिळणार संधी**

या परीक्षा केंद्रावर केवळ शाळांमधील नियमित पात्र विद्यार्थीच नव्हे, तर तालुक्यातील इतर बाह्य विद्यार्थीसुद्धा आपले अर्ज दाखल करू शकणार आहेत. त्यामुळे मौदा तालुक्यातील कला क्षेत्राची आवड असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला आता स्थानिक पातळीवरच आपली कला सिद्ध करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. या परीक्षेचे अनेक फायदेसुद्धा आहेत दहावीच्या बोर्ड परीक्षेत या परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त सवलतीचे गुण मिळतात, ज्यामुळे त्यांचा एकूण टक्का वाढण्यास मदत होते. राज्य शासनाच्या कला संचालनालयातर्फे दिले जाणारे हे प्रमाणपत्र राज्यभर मान्यताप्राप्त आहे. भविष्यात फाइन आर्ट्स, आर्किटेक्चर, डिझायनिंग, ॲनिमेशन यांसारख्या उच्च व व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना या परीक्षांचा पाया अत्यंत उपयुक्त ठरतो. विद्यार्थ्यांमधील सृजनशीलता, कल्पकता आणि एकाग्रता वाढवण्यास या परीक्षा मदत करतात. या नवीन केंद्रामुळे मौदा तालुक्यातील पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

> "तालुक्यातील गुणवंत आणि कलाप्रेमी विद्यार्थ्यांची गैरसोय दूर होऊन त्यांना स्वतःच्या तालुक्यातच परीक्षा देता यावी, यासाठी आम्ही हे केंद्र मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्नशील होतो. पहिल्यांदाच आपल्या तालुक्यात हे केंद्र आले असून, शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांसह तालुक्यातील इतर सर्व बाह्य विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी आपले अर्ज भरून या सुवर्णसंधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा."
>
> **-गटशिक्षणाधिकारी, मौदा**

# ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने अरोली दुमदुमली

## आषाढी एकादशीनिमित्त समर्थ रामदास विद्यालयात पंढरपूर वारीचा भक्तिमय सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त,**
**काचुरवाही- शुभम कामळे**

समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय अरोली तसेच समर्थ रामदास प्राथमिक विद्यामंदिर अरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर वारीचा भक्तिमय आणि उत्साह सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. संपूर्ण विद्यालय परिसर "ज्ञानोबा-तुकाराम", "जय जय राम कृष्ण हरी" आणि विठ्ठल नामाच्या गजराने भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.



कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष शिवाजीराव कुंभलकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून संस्था सचिव नंदाताई घटे, सरपंचा रोशनी प्रशांत भुरे, स्नेहल राऊत ठाणेदार पोलीस स्टेशन अरोली, केंद्रप्रमुख रुस्तम मोटघरे, प्रमिला भैसारे, हिरापुरे, रजत कुंभलकर, प्राचार्य सुनिल बडवाईक, मुख्याध्यापक सुनील डडमल तसेच पर्यवेक्षक केशव डोकरीमारे यांची प्रमुख उपस्थिती होते.

विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ-मृदंग, भगवे ध्वज, विठ्ठल-रुक्मिणीचा देखावा आणि बैलगाडी दिंडीच्या माध्यमातून पंढरपूर वारीचा अनुभव साकारला. भक्तिगीते-नृत्य आणि रिंगण यामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत वारकरी संप्रदायातील भक्ती, समता, संस्कार आणि सामाजिक ऐक्याचा संदेश विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा असे प्रतिपादन केले.सरपंचा रोशनी भुरे व प्रशांत भुरे यांनी वारकरी विद्यार्थ्यांना राजगिऱ्याचे लाडू वाटप केले. संस्थाध्यक्ष शिवाजीराव कुंभलकर यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना चिक्कीचे वाटप करण्यात आले. शिवाजी मदनकर यांनी वारकरी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. प्रसाद वाटपामुळे विद्यार्थ्यांच्या आनंदात अधिक भर पडली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन उईके, संजय पुरी, विनेश फुलेकर, गणेश भलावीर, प्रशांत बालपांडे, संजय बावणे, प्रवीण मोहनकर, प्रशांत मोटघरे, महेश लिचडे, नारायण वंजारी, अश्विन कुंभलकर, उषा कौरती, मोहीनी कुंभलकर, कविता आंबटकर, धनश्री उरकुडकर, प्रा. किरण धुर्वे, प्रा. स्नेहा गभणे, भाग्यश्री श्रावणकर, पायल जांभुळकर, प्रियंका बावनगडे, उषा मनगटे, जयश्री धुर्वे, लता मेश्राम, भाग्यश्री तहेकर, सुनिता सोनारे, आरती कारेमोरे, सुरेश रामटेके, मंगेश मोहनकर, आदी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन धनश्री उरकुडकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रिती भुजाडे यांनी केले. सुधीर पोटभरे यांनी वंदेमातरम् गीत घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**थोडक्यात**

## मौदा येथे शिक्षक-पालक सभेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, मौदा**

दिनांक २४ जुलै २०२६ रोजी जनता विद्यालय, मौदा (प्रभात शाखा) येथे शिक्षक-पालक सभेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या सभेच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापकअनिलजी मेश्राम होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे उपमुख्याध्यापक तांबडे, ज्येष्ठ शिक्षिका परसतवार मॅडम, परीक्षा विभाग प्रमुख पंकज पिसे सर, शिक्षक-पालक संघाचे माजी सचिव श्री. मोरया सर तसेच इंगोले सर उपस्थित होते. सभेमध्ये नव्या शिक्षक-पालक संघाची स्थापना करण्यात आली. संघाच्या सचिवपदी श्री. इंगोले सर, उपाध्यक्षपदी प्रदीपजी मानवटकर, सहसचिवपदी श्रीमती नेहा वैकुंठी यांची निवड करण्यात आली. तसेच पिता-पालक प्रतिनिधी म्हणून श्री. फिरोज अहमद शेख आणि माता-पालक प्रतिनिधी म्हणून श्रीमती निलेश्वरी टेंभरे यांची निवड करण्यात आली. सभेत विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी, शिक्षकांचे अध्यापन, बस प्रवासाची समस्या, स्वाध्याय, गृहपाठ, शालेय शिस्त तसेच पालकांची भूमिका या विषयांवर विधायक मंथन झाले.

मुख्याध्यापक श्री. अनिलजी मेश्राम सर यांनी पालकांनी आपल्या पाल्यांवर चांगले संस्कार कसे करावेत, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका किती महत्त्वाची आहे, याविषयी अतिशय प्रभावी व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तांबडे सर यांनी केले. त्यानंतर पंकज पिसे सर यांनी विद्यार्थ्यांची उपस्थिती, गृहपाठ, शालेय अभ्यासक्रम, शालेय शिस्त आणि पालकांची जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सादतकर सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमती परसतवार मॅडम यांनी केले.

## मेंढला येथील शांताबाई इंगोले यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**



मेंढला येथील रहिवासी शांताबाई नामदेवराव इंगोले (वय ८५ वर्षे) यांचे आज, रविवार दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने मेंढला परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्यावर सोमवार, दुपारी १२ वाजता मेंढला येथील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## ...अखेर खापरखेडा (तेली)ते पारडीखुर्द पर्यायी पूल वाहल्यामुळे बंद असलेली वाहतूक आजपासून सुरू

### सनरायझर्स कन्स्ट्रक्शन कंपनीचे वाहनधारकांनी मानले आभार



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

तीन दिवसांपूर्वी सुरू असलेल्या सततधार पावसाने खापरखेडा (तेली) ते पारडीखुर्द दरम्यान नाल्यावरील पर्यायी पूल बुधवार ( ता.२२ जुलै )ला वाहून गेलेला होता. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे बंद होती. दोन दिवसापासून पावसाने विश्रांती घेतल्याने संबंधित कंत्राटदाराने वाहलेला पयार्यी पूल दुरुस्त करण्यासाठी व जुन्या पुलाच्या ठिकाणी नवीन पुलाचे शेवटच्या टप्प्यावरील बांधकाम युद्ध स्तरावर सुरू केल्याने उद्या रविवार (ता.२६ जुलै) सकाळपासून वाहतूक सुरू होणार असल्याचे शनिवार (ता.२५ जुलै)ला संबंधित रस्त्याचे कंत्राटदाराचे सुपरवायझर शबीर मडावी यांनी दुपारी तीनच्या दरम्यान प्रत्यक्ष स्थळावर भेट देऊन विचारपूस केली असता सांगितले व त्यांनी सांगितल्यानुसार अखेर आज रविवार (ता. २६ जुलै) ला सकाळपासून वाहतूक सुरू झालेली आहे.

त्यामुळे युद्ध पातळीवर काम करून वाहतूक सुरू करणाऱ्या या रस्त्याचे कंत्राटदार सनरायझर्स कन्स्ट्रक्शन कंपनीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे या रस्त्यावरून वाहतूक करणाऱ्या चारचाकी, दुचाकीधारक नागरिकांसह शेतकऱ्यांनी आभार मानले. अरोली ते मौदा दरम्यान तयार होणाऱ्या या रस्त्याचे अरोली - पार्डिकला -निमखेडा -भेंडाळा- आजनगाव या अंदाजे १४ ते १५ किलोमीटर रस्त्याचे सिमेंटकरण जवळपास पूर्ण झाल्याने व हा खडबडीत अरुंद असणारा रस्ता गुळगुळीत रुंद झाल्याने रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढलेली आहे, हे विशेष !

## रामेश्वर ठाकरे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



शिवशक्ती नगर येथील रहिवासी रामेश्वर ठाकरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ५५ होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांत बराच मोठा परिवार आहे. सोमवार दि. २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजता. मानेवाडा घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

थोडक्यात

## कामावर असतानाच हृदयविकाराचा झटका; बांधकाम मजुराचा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**

शहरातील एका घराच्या बांधकामावर काम करत असताना मजुराला अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्याचा



मृत्यू झाला. शनिवारी दुपारी घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत मजुराचे नाव प्रमोद भाऊराव बावणे (वय ५०, रा. तातोली, ता. भिवापूर) असे आहे. ते शहरातील प्रभाग क्रमांक १४ मध्ये सुरू असलेल्या एका घराच्या बांधकामावर मजूर म्हणून कार्यरत होते. विशेष म्हणजे, संबंधित बांधकामावरील कामाचा त्यांचा तो पहिलाच दिवस होता. दुपारच्या भोजनावकाशानंतर त्यांनी पुन्हा कामाला सुरुवात केली. मात्र, दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्रकृती अचानक बिघडली. सहकारी मजुरांनी तत्काळ त्यांना भिवापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. या आकस्मिक घटनेमुळे सहकारी मजूर, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली असून, प्रमोद बावणे यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## महाकाली नगर हनुमान मंदिर परिसरात वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**दै.सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाकाली नगर -१ येथील हनुमान मंदिर परिसरात रविवारी सामाजिक कार्यकर्ते आशिष काळे यांच्या नेतृत्वाखाली वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश देण्यासाठी आयोजित या उपक्रमाला वस्तीतील ज्येष्ठ नागरिक, युवक तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमा दरम्यान विविध प्रकारची वृक्षलागवड करण्यात आली. लावण्यात आलेल्या रोपांचे संगोपन करण्याची जबाबदारीही स्थानिक नागरिकांनी स्वीकारली. यावेळी उपस्थितांनी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प केला.

सामाजिक कार्यकर्ते आशिष काळे यांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षलागवडीचे महत्त्व अधोरेखित करत, स्वच्छ व हरित परिसर घडविण्यासाठी नागरिकांनी सातत्याने अशा उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. या वृक्षारोपण उपक्रमामुळे परिसरात पर्यावरणाबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून, स्थानिक नागरिकांनी या सामाजिक उपक्रमाचे स्वागत केले.

## शिवसेना वाहतूक सेनेच्या शहराध्यक्षपदी राजेंद्र (राजन) टाकभवरे यांची नियुक्ती



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शिवसेना वाहतूक सेनेच्या शहराध्यक्षपदी राजेंद्र (राजन) छोटेलाल टाकभवरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख गौरव रामकुमार गुप्ता यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. ही नियुक्ती शिवसेना नेते तथा विधान परिषद आमदार कृपालजी तुमाने, पूर्व विदर्भ संघटक किरणजी पांडव, युवासेना सचिव शुभमजी नवले आणि वाहतूक सेना विदर्भ अध्यक्ष राहुलजी उके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी नवनियुक्त शहराध्यक्ष राजेंद्र (राजन) टाकभवरे यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच वाहतूक सेनेचे कार्य शहरातील प्रत्येक विभागापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. नियुक्ती प्रसंगी सोशल मीडिया पूर्व विदर्भ अध्यक्ष योगेश पौनिकर, युवासेनेचे माजी उपजिल्हाप्रमुख आकाश पांडे, सामाजिक कार्यकर्ते व वरिष्ठ शिवसैनिक निरंजनजी दहीवले, नंदकिशोर माटे, वाहतूक सेना उपजिल्हाप्रमुख अभिषेक थुल, एजाज अन्सारी, मंगेश दुबे, आकाश गुप्ता, विनीत पांडे, येशु कोल्टे तसेच शिवसेना वाहतूक सेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त शहराध्यक्ष राजेंद्र (राजन) टाकभवरे यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील कायार्साठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## झंडू कुमारने भारताचे पदक खाते उघडले

**ग्लासगो :** ग्लासगो येथे सुरू असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताने अखेर पदकांचे खाते उघडले. बिहारचा पॅरा पॉवरलिफ्टर



झंडू कुमार याने पुरुष हेविवेट गटात कांस्यपदकाची कमाई केली. १९० किलो वजनाची यशस्वी उचल करत त्याने १३०.९ गुण मिळवले आणि भारताला स्पर्धेतील पहिले पदक मिळवून दिले. २८ वर्षीय झंडू कुमारने ब गटामधून खेळताना पहिल्याच प्रयत्नात १८१ किलो, तर दुसरा प्रयत्नात १९० किलो वजन उचलले. त्यामुळे त्याला १३०.९ गुण मिळाले. तिसऱ्या प्रयत्नात त्याने १९६ किलो वजन उचलून बर्किंगहम २०२२ मधील स्पर्धा विक्रम मोडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो अपयशी ठरला. तरीही त्याची दुसरी सर्वोत्तम उचल कांस्यपदकासाठी पुरेशी ठरली. नायजेरियाच्या रिलुवान इद्रिसने सुवर्ण, तर इंग्लंडच्या मॅथ्यू होर्डिंगने रौप्यपदक पटकावले.

बिहारमधील नालंदा जिह्यातील हरनौत येथील झंडू कुमार बालपणापासून पोलिओग्रस्त आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी त्याने वडिलांसोबत रस्त्यावर भाजीपाला विकला.

# विदर्भ साहित्य संघाच्या सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा

### दिवंगतांना श्रद्धांजली; आर्थिक, प्रशासकीय व संकुलासंदर्भातील प्रश्नांवर मंथन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विदर्भ साहित्य संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी उत्साहात पार पडली. सभेच्या प्रारंभी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मागील सभेचा अहवाल, मागील २५ वर्षांचे कार्यवृत्त तसेच विश्वस्तांचा अहवाल सभेपुढे सादर करण्यात आला.

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेत पार पडलेल्या या सभेला उपाध्यक्ष अरुणा सबाने, बाळ कुळकर्णी व चंद्रकांत लाखे, सरचिटणीस विलास मानेकर, माधुरी साकुळकर, शुभदा फडणवीस, आसावरी तिडके, श्रीपाद अपराजित यांच्यासह इतर कार्यकारीणी सदस्य उपस्थित होते. या सभेला एकुण ७० सदस्य उपस्थित होते.

सभेत संघाचे लेखापरीक्षक म्हणून महेश्वर गद्रे अँड कंपनी यांची नियुक्ती पुढील कार्यकाळासाठी कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

सभेदरम्यान संघाच्या आर्थिक स्थितीसंदर्भात उपस्थित सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला असताना गिरीश गांधी स्पष्टीकरण देताना हा १० कोटी रुपयाचा निधी बँकेत मुदतठेव स्वरूपात असून त्यावरील सुमारे ८२ लाख रुपयांचे व्याज बँकेत जमा झाले असल्याचे सांगण्यात आले.शासनाकडून मंजूर असलेल्या नियमांनुसार हा निधी केवळ ग्रंथालय, साहित्य संमेलन, पुरस्कार, कार्यशाळा, कथाकथन, लेखकांचे जन्मशताब्दी महोत्सव, शाखांचे पूर्वपरवानगीने केलेले साहित्यिक कार्यक्रम व मराठी भाषेच्या प्रचार व प्रसारासाठीचे कार्यक्रम या बाबींवरच खर्च करता येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, प्रशासकीय खचार्साठीही या निधीचा वापर करण्यास परवानगी मिळावी, अशी मागणी शासनाकडे करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

संघाच्या संकुलासंदर्भातील प्रश्नांवरही सविस्तर चर्चा झाली. अग्निशमन विभागाची ना हरकत अद्याप प्राप्त न झाल्याने सदनिकांमधील तसेच 'अमेय' सभागृहातील कार्यक्रम तात्पुरते बंद ठेवण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. बिल्डरकडून अग्निसुरक्षे संदर्भातील आवश्यक कामे सुरू असून ती पूर्ण झाल्यानंतर आणि आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर बंद असलेल्या उपक्रमांना पुन्हा सुरुवात करता येईल, असे सांगण्यात आले. तसेच पार्किंगची सुविधा उपलब्ध नसल्याने थिएटर सुरू करता येत नसल्याचेही गिरीश गांधी यांनी स्पष्ट करण्यात केले. सभेत सर्व सदस्यांसाठी ५,००० वार्षिक सदस्य शुल्क कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

याशिवाय शासनाकडे विद्यमान जागेच्या बदल्यात सुमारे दोन एकर पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची, त्या ठिकाणी सुमारे १०० कोटी खर्चून नवे साहित्य संकुल उभारण्याची तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी ५० कोटींचा कायमस्वरूपी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी लक्ष घातले असून यातून सकारात्मक मार्ग निघेल, अशी अपेक्षा गिरीश गांधी यांनी व्यक्त केली.

कार्यकारी मंडळाच्या बैठकीत यापूर्वी निष्कासित करण्यात आलेल्या सदस्यांना पुन्हा सन्मानाने सदस्यत्व देण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयास सर्वसाधारण सभा आणि कार्यकारिणीनेही मान्यता दिली. याशिवाय, संघाच्या विविध प्रशासकीय, आर्थिक आणि विकासात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करून अनेक महत्त्वाच्या ठरावांना मंजुरी देण्यात आली. ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

## आदिवासी विकास विभागातील चौकीदार पदाची परीक्षा २ ऑगस्टला

### सुधारित प्रवेशपत्र डाउनलोड करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :** आदिवासी विकास आयुक्त, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिपत्याखालील तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांच्या आस्थापनेवरील शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील गट-ड संवर्गातील चौकीदार पदाच्या ४७८ रिक्त जागांसाठी दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी राज्यस्तरीय जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या पदासाठी सरळसेवा भरती परीक्षा महाराष्ट्रातील विविध परीक्षा केंद्रांवर ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येत आहे. पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार ही परीक्षा २८ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणार होती. मात्र, परीक्षार्थींकडून प्राप्त झालेल्या परीक्षा केंद्र बदलाबाबतच्या विनंत्या व निवेदनांचा विचार करून परीक्षा केंद्र व वेळापत्रकात काही बदल करण्यात आले आहेत. चंद्रपूर प्रकल्पासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची परीक्षा २८ जुलै २०२६ रोजी शिफ्ट-२ मध्ये होणार होती. मात्र, आता या परीक्षेच्या दिनांक व शिफ्टमध्ये बदल करण्यात आला असून, संबंधित उमेदवारांची परीक्षा २ ऑगस्ट २०२६ रोजी शिफ्ट-१ मध्ये सकाळी १० वाजता घेण्यात येणार आहे. त्यामुळे चंद्रपूर प्रकल्पासाठी अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांनी या बदलाची नोंद घेऊन सुधारित प्रवेशपत्र (अ‍ॅ३ उंश्ί) डाउनलोड करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, इतर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांसाठी अर्ज केलेल्या काही उमेदवारांना त्यांनी पसंती दिलेल्या परीक्षा केंद्रापेक्षा लांबचे परीक्षा केंद्र देण्यात आले होते.

## जिल्हाधिकाऱ्यांची बल्लारपूर येथील विशेष मतदार पुनरीक्षण शिबिराला भेट : बीएलओ कार्याचा घेतला आढावा

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण अभियानांतर्गत बल्लारपूर येथील कॉलरी काटा-गेट परिसरात आयोजित करण्यात आलेल्या विशेष शिबिराला शनिवारी २५ जुलै रोजी चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शिबिरात कार्यरत असलेल्या बीएलओ (केंद्रस्तरीय अधिकारी) यांच्या गणना पत्रकांची तसेच इछड अस्त्रस्त्र मधील नोंदींची तपासणी केली. गणना पत्रक भरताना येणाऱ्या अडचणी जाणून घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करत मतदार नोंदणीचे काम अधिक अचूक व प्रभावीपणे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

या पाहणीवेळी उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन पावरा, तहसीलदार रेणुका कोकाटे, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा नायब तहसीलदार महेंद्र फुलझेले, गटविकास अधिकारी धनंजय साळवे, नगर परिषद मुख्याधिकारी विशाल वाघ, गट शिक्षण अधिकारी सचिन मालवी, पर्यवेक्षक श्रीनिवास रायला व राजेंद्र गुडध्ये उपस्थित होते.

शिबिरात विनय दत्ता, श्रावंती इसंपल्लीवार, संजय बोज्जा, सूरज वाघमारे, संतोष काकडे, शुभम काटेवार, तुलसीदास राठोड, गोमती वर्मा, नूतन पेंदे, सुनीता घुबडे, सन्नी महेश्वरी, नंदा उपासे यांच्यासह अनेक केंद्रस्तरीय अधिकारी व शंकर रामटेके, अभय वडस्कर, उमेश पोडे, दीपक प्रसाद या बीएलओ सहाय्यक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात सामाजिक कार्यकर्ते प्रकाश खरतड तसेच नगर परिषद सदस्य अविनाश मठ्ठा यांनी सहकार्य केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या भेटीमुळे विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला अधिक गती मिळणार असून, मतदार नोंदणीची प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि वेळेत पूर्ण करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे.

## आयटीआय प्रशिक्षकांच्या राज्यस्तरीय टीओटी प्रशिक्षणाचा समारोप

### कौशल्य विकासासाठी प्रशिक्षकांची भूमिका महत्त्वाची : मंत्री मंगल प्रभात लोढा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संताजी जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, श्रद्धानंद पेठ येथे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत आयोजित राज्यस्तरीय TOT (Training of Trainers) प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप रविवारी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी माजी कुलगुरू डॉ. चांदेकर, आयएमसी अध्यक्ष गिरीश देशमुख, सहसंचालक पी.टी.देवतळे, उपसंचालक हेमंत आवारे, उपसंचालिका एस.एस.कुलकर्णी, जिल्हा व्यवसाय शिक्षण अधिकारी पी.जी.ठाकरे, व ६ विभागामधील ४० शिल्प निदेशक ट्रेनिंग करता उपस्थित झाले होते तसेच ASEF, TDM,फिटर, व्यवसायातील राज्यभरातील शिल्प निदेशक या ट्रेनिंग करता उपस्थित होते. मंत्री लोढा यांनी सांगितले की, राज्यातील सहाही प्रादेशिक विभागांतील प्रशिक्षकांना या प्रशिक्षणाद्वारे आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगाभिमुख अध्यापन आणि कौशल्यविकासाचे प्रशिक्षण देण्यात आले. २० टक्के सैद्धांतिक आणि ८० टक्के प्रात्यक्षिक प्रशिक्षणामुळे आयटीआयमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षणादरम्यान आधुनिक यंत्रसामग्री, उद्योगभेटी, अध्यापन पद्धती व मूल्यांकन प्रक्रियेचे मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल मंत्री लोढा यांनी संस्थेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश केने यांनी तर आभार उपसंचालिका एस.एस.कुलकर्णी यांनी मानले. अशी माहिती प्रसिद्धी प्रमुख सहदेव चव्हाण यांनी दिली.

## भिष्णूरमध्ये अवतरले भक्तीमय पंढरपूर! नरखेडच्या पालखीच्या स्वागताने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसर दुमदुमला

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त नरखेड येथून आगमन झालेल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी पालखीचे भिष्णूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दिनेशभाऊ टुले यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात, पारंपरिक व भक्तिमय वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. टाळ-मृदुंग, वीणा, झांज यांच्या निनादात "ज्ञानोबा-तुकाराम", पुंडलिक वरदा हरी विठ्ठल" आणि "विठ्ठल-विठ्ठल"च्या अखंड गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला.



पालखी आगमनावेळी फुलांची उधळण करून श्री विठ्ठल-रुक्मिणींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वारकरी संप्रदायातील महिला-पुरुषांनी फुगड्या, अभंग आणि हरिपाठ सादर करत भक्तिमय वातावरण अधिकच भारावून टाकले. लहान मुले, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला मोठ्या संख्येने पालखी सोहळ्यात सहभागी झाल्या.

यावेळी दिनेशभाऊ टुले यांनी पालखीचे दर्शन घेत स्वतः टाळ हाती घेऊन भजनात सहभाग नोंदविला. त्यांच्या सहभागामुळे उपस्थित भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या परंपरेचे जतन करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत समाजात अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्यासाठी अशा धार्मिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. पालखीच्या दर्शनासाठी भिष्णूरसह परिसरातील हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात दिवसभर नामस्मरण, हरिनाम सप्ताह, अभंगगायन आणि भजनाचा अखंड स्वर घुमत होता. संपूर्ण वातावरण भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेने भारावून गेले होते. अनेक भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणींचे दर्शन घेऊन कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

पालखी स्वागतानंतर सर्व भाविकांना फराळ व महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. स्वयंसेवकांनी भाविकांच्या दर्शनासाठी व वाहतूक व्यवस्थेसाठी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी बोलताना दिनेशभाऊ टुले म्हणाले, "वारकरी संप्रदाय ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. धर्म, संस्कृती आणि संतपरंपरेचे जतन करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य-दिव्य श्रीमद्भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात येणार असून, सर्व भाविकांनी या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा," असे आवाहन त्यांनी केले.

हा संपूर्ण सोहळा अत्यंत भक्तिमय, उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. भिष्णूर गावाने या पालखी सोहळ्याच्या निमित्ताने जणू पंढरपूरचेच रूप धारण केले होते. वारकरी, भाविक, ग्रामस्थ आणि मान्यवरांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला धार्मिक आणि सामाजिक एकात्मतेची सुंदर किनार लाभली.

थोडक्यात

## 7 Notes Entertainers तर्फे 'सुरों की महफिल' उत्साहात

### 'द नेक्स्ट व्हॉइस - विदर्भस्तरीय सोलो सिंगिंग स्पर्धा २०२६'ची भव्य घोषणा




**दै. सिंहवाणी वृत्त नागपूर**

7 Notes Entertainers च्यावतीने आयोजित 'सुरों की महफिल' हा संगीताचा बहारदार कार्यक्रम अजनी चौक, वर्धा रोड येथील हॉटेल के.पी.इन येथे उत्साहपूर्ण संपन्न झाला. या कार्यक्रमाला शहरातील संगीतप्रेमी, गायक-कलाकार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जेष्ठ पत्रकार प्रभाकर दुपारे, प्रमुख अतिथी वृंदाताई ठाकरे तसेच विशेष अतिथी हर्षा चौधरी आणि रवी हातेकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी 7 Notes Entertainers च्या या उपक्रमाचे कौतुक करत नवोदित संगीत प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांचे अभिनंदन केले. यावेळी 'द नेक्स्ट व्हॉइस - विदर्भस्तरीय सोलो सिंगिंग स्पर्धा २०२६' ची अधिकृत घोषणा करण्यात आली. स्पर्धेचा उद्देश, नियमावली, नोंदणी प्रक्रिया, आकर्षक बक्षिसे तसेच स्पर्धकांना मिळणाऱ्या विविध संधींची सविस्तर माहिती उपस्थित कलाकार व संगीतप्रेमींना देण्यात आली. कार्यक्रमा दरम्यान विविध गायक- कलाकारांनी सादर केलेल्या सुरेल गीतांनी उपस्थितांची मने जिंकली. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन अँकर ओमप्रकाश साहू यांनी केले. त्यांच्या ओघवत्या शैलीमुळे कार्यक्रम अधिक रंगतदार झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन 7 Notes Entertainers चे संचालक व आयोजक यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. आयोजक राहुल वहाने यांच्यासह संपूर्ण आयोजन समितीने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात कोअर टीममधील विनोद बोबडे, प्रमोद जोंधळे, तृप्ती पाटील, संजय आंबादे, संजय खोब्रागडे, हेमा नागोसे, साधना भुजाडे, अर्चना आणि ममता ठवरे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवर, कलाकार, सहकारी आणि उपस्थित संगीतप्रेमींचे आभार मानण्यात आले. तसेच अधिकाधिक इच्छुक गायकांनी 'द नेक्स्ट व्हॉइस -विदर्भस्तरीय सोलो सिंगिंग स्पर्धा २०२६' मध्ये सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले.

## वाढदिवसापुरता मर्यादित नाही, जनतेच्या सुख-दु:खात कायम सहभागी असलेले आ. संजय पुराम



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**

भारतीय जनता पार्टीचे देवरी शहराध्यक्ष पारसजी काटकवार यांच्या वाढदिवसानिमित्त आमगाव-देवरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार संजय पुराम यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी पारसजी काटकवार यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, सुख-समृद्धी लाभो तसेच जनसेवा आणि संघटन बळकटीसाठी त्यांचे कार्य अधिक यशस्वी होवो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना व्यक्त केली. आमदार संजय पुराम यांची कार्यशैली ही केवळ राजकीय कार्यक्रमांपुरती मर्यादित नसून ती जनतेशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याची साक्ष देणारी आहे. वाढदिवस, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक किंवा विकासकामांशी संबंधित कोणताही कार्यक्रम असो, ते स्वतः उपस्थित राहून नागरिकांशी संवाद साधतात. त्यामुळे मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता आणि विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. मतदारसंघातील नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी ते सातत्याने गावोगावी भेटी देत असून, समस्या समजून घेऊन त्या संबंधित विभागांमार्फत मार्गी लावण्यासाठी तत्परतेने पाठपुरावा करतात. लोकप्रतिनिधी म्हणून जनतेसाठी सदैव उपलब्ध राहण्याची त्यांची भूमिका अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

साधेपणा, लोकांशी जिव्हाळ्याचे नाते, विकासाभिमुख दृष्टीकोन आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांप्रती संवेदनशीलता या गुणांमुळे आमदार संजय पुराम यांनी मतदारसंघात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारा आणि विकासाला सर्वोच्च प्राधान्य देणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. देवरी येथील या वाढदिवसाच्या कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनीही आमदार संजय पुराम यांच्या जनसंपर्कशील स्वभावाचे आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीचे कौतुक केले.

## नीता क्षीरसागर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



नीता नरेंद्र क्षीरसागर यांचे रविवारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात नीरज , मकरंद, ही दोन मुले नयन, मीनल, निवेदिता आणि नमिता या चार मुली आणि बराच मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंबाझरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कौशल्य विद्यापीठासाठी महिनाभरात जागा देणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### नागपूर स्किल सेंटरचे औपचारिक उद्घाटन थाटात, एआयडी, टाटा स्ट्राईव्ह, मनपा आणि विदर्भ ग्लोबल फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेवलपमेंटच्या माध्यमातून नागपुरात प्रस्तावित असलेल्या स्किल युनिव्हर्सिटीसाठी महिनाभरात जागा उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विदर्भातील उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या नागपूर स्किल सेंटरचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.



पारडी येथील फायर ब्रिगेड कार्यालय समोरील मनपातर्फे स्मार्ट सिटी अंतर्गत निर्मित कौशल्य विकास केंद्रात हा भव्य उद्घाटन सोहळा पार पडला. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेवलपमेंट, टाटा स्ट्राईव्ह, नागपूर महानगरपालिका, स्किल इंडिया अभियान आणि विदर्भ ग्लोबल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे अत्याधुनिक कौशल्य विकास केंद्र उभारण्यात आले आहे.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की हे विद्यापीठ अत्यंत प्रगत आणि कटिंग-एज स्वरूपाचे असावे, अशी आपली इच्छा आहे. या विद्यापीठातून बाहेर पडणारा प्रत्येक युवा रोजगारक्षम असावा. विक्रमी कालावधीत उत्कृष्ट विद्यापीठ उभारले जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आजच्या स्पर्धात्मक युगात रोजगारक्षम होण्यासाठी कुशल मनुष्यबळाची मोठी गरज असून, प्रत्येकाने सातत्याने आपले कौशल्य अद्ययावत (अपग्रेड) करत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात सौरऊर्जा क्षेत्राची मोठी इकोसिस्टीम तयार होत असून, त्यासाठीही तंत्रज्ञानात प्रवीण असलेल्या युवकांची मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये या केंद्राच्या माध्यमातून युवकांना मिळतील आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असे सांगत त्यांनी नागपूर स्किल सेंटरचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक एआयडीचे अध्यक्ष आशीष काळे यांनी केले. त्यांनी उपस्थितांचे तसेच पहिल्या तुकडीतील विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विदर्भातील उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी हे स्किल सेंटर महत्त्वाची भूमिका बजावेल, असे ते म्हणाले. येथून प्रशिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला उत्तम प्लेसमेंट मिळेल, यासाठी प्रयत्न केले जातील. तसेच माफक आणि परताव्यायोग्य ठेव रक्कम असल्याने हे केंद्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

त्यानंतर टाटा स्ट्राईव्हचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमेय वंजारी यांनी अशा अनेक कौशल्य विकास केंद्रांची गरज असल्याचे सांगितले. हे केंद्र उद्योगांच्या कौशल्यविषयक गरजा निश्चितपणे पूर्ण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ताज हॉटेल, स्टारबक्स, बजाज यांसारख्या नामांकित संस्थांशी भागीदारी झाल्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा मोठा लाभ होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच टाटा स्ट्राईव्हच्या अन्य उपक्रमांचीही त्यांनी माहिती दिली.

**पारडीतील युवकांसाठी रोजगाराचे नवे दालन : गडकरी**

पारडी हा पूर्व नागपुरातील मागास भाग असून, येथील गरीब, गरजू विद्यार्थी आणि युवकांना या कौशल्य विकास केंद्राचा विशेष लाभ होईल, असे मत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केले. येथील अभ्यासक्रम पूर्णपणे रोजगाराभिमुख असून, या केंद्राच्या माध्यमातून दरवर्षी पाच हजार युवकांना रोजगार मिळवून देण्याचे लक्ष्य नागपूर महानगरपालिकेने ठेवावे, असे त्यांनी सुचविले. या केंद्रासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून मायनिंग फंडातून निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले. याशिवाय, १०० एकर जागेवर उभारण्यात येणाऱ्या स्किल युनिव्हर्सिटीचा प्रस्ताव आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे दिल्याची माहितीही गडकरी यांनी यावेळी दिली.

**सामंजस्य करार**

ज्ञानाची देवाणघेवाण आणि कौशल्य विकासाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी (आणि असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. एनएडीपीतर्फे मुख्य संचालक जे. पी. दाश आणि एआयडीतर्फे अध्यक्ष आशीष काळे यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

**नवीन प्रकल्पाची घोषणा**

यावेळी श्री राज आयर्न अँड स्टील प्रॉडक्ट्स प्रा. लि., हैदराबाद यांनी चंद्रपूर जिल्ह्यात इंटिग्रेटेड स्टील प्लांट उभारण्यासाठी सुमारे ८००+ कोटींच्या गुंतवणुकीची घोषणा केली. या प्रकल्पाची चार टप्प्यांत अंमलबजावणी करण्यात येणार असून, त्यासंदर्भातील स्वारस्यपत्र मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द करण्यात आले. असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट आणि कंपनीच्या संस्थापक संचालक किशन अग्रवाल व अनुराग अग्रवाल यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या प्रकल्पातून १,२०० थेट आणि ३०० अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी भाजपातर्फे देवेंद्र मेहेर यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी खासदार अजय संचेती, आमदार कृष्णा खोपडे, राजीव पोतदार, संजय भेंडे, विजय शिरसाट, मनपा स्थायी समितीच्या प्रमुख शिवानी दाणी-वखरे, मनपा आयुक्त डॉ. विपीन, महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड अश्विनी जीचकर, नीता अवघड, महेश्वरी बिसेन आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच असोसिएशन फॉर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंटचे पदाधिकारी प्रणव शर्मा, गिरधारी मंत्री, राजेश बागडी, संजय गुप्ता, अशोक गोयल, विनोद तांबी, महेश साधवानी, अविनाश घुशे, राजेश रोकडे, महेंद्र क्षीरसागर, शिवकुमार राव, सीईओ कपिल चांद्रायन, आणि कार्यकारी सचिव पंकज भोकरे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

## सालेकसा रेल्वे स्थानकावर इतवारी-बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसच्या थांब्यासाठी खा. राजेंद्र जैन यांना निवेदन

### लवकरच पाठपुरावा करण्याची ठोस हमी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा-राजू फुंडे**

सालेकसा तालुक्यातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची प्रलंबित मागणी असलेल्या ट्रेन क्रमांक १२८५६/१२८५५ इतवारी-बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसला सालेकसा रेल्वे स्थानकावर अधिकृत थांबा मिळावा, यासाठी दिनांक २६ जुलै २०२६ रोजी गोंदिया येथील रेलटोली परिसरातील माननीय खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या कार्यालयात नवनिर्वाचित खासदार राजेंद्र जैन यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनामध्ये नमूद करण्यात आले की, सन २००८ पासून सालेकसा रेल्वे स्थानकावर इंटरसिटी एक्सप्रेसच्या थांब्याची मागणी प्रलंबित असून, या सुविधेअभावी तालुक्यातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, कर्मचारी तसेच अधिकारी यांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

यावेळी खासदार राजेंद्र जैन यांनी सांगितले की, त्यांची रेल्वे मंत्रालयाच्या समितीवर निवड झाली असून, माननीय खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या सहकार्याने या विषयाकडे तातडीने लक्ष देण्यात येईल. तसेच रेल्वे प्रशासनाशी आवश्यक पत्रव्यवहार करून आणि संबंधित अधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सालेकसा



रेल्वे स्थानकावर इतवारी-बिलासपूर इंटरसिटी एक्सप्रेसचा थांबा मंजूर करून घेण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला जाईल, अशी ठोस ग्वाही त्यांनी दिली.

खासदारांनी दिलेल्या सकारात्मक आश्वासनामुळे सालेकसा तालुक्यातील नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून, ही दीर्घकालीन मागणी लवकरच पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष डॉ. अजय उमाटे, सालेकसा शहराध्यक्ष ब्रजभूषण बैस, जिल्हा महासचिव डॉ. हिरालाल साठवणे, तालुका युवक अध्यक्ष बाजीराव तरोने, सामाजिक न्याय विभागाचे तालुका अध्यक्ष राजू डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य जितेंद्र बडोले, अनिल अग्रवाल, रिषी बैस तसेच पक्षाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## दिल्ली पब्लिक स्कूल, नागपूर येथे शिक्षकांसाठी पॉक्सो जनजागृती कार्यशाळा



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिल्ली पब्लिक स्कूल, कामठी रोड, नागपूर येथे जिल्हा महिला व बाल विकास विभागांतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने जिल्हा बाल संरक्षण अधिकारी मुश्ताक पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांसाठी 'पॉक्सो कायदा व बाल संरक्षण जनजागृती कार्यशाळा' आयोजित करण्यात आली. कार्यशाळेदरम्यान शिक्षकांना बालकांचे संरक्षण, लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायद्याच्या महत्त्वपूर्ण तरतुदी, शिक्षकांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या, संशयास्पद घटनांची नोंद करण्याची प्रक्रिया तसेच बालकांसाठी सुरक्षित, संवेदनशील आणि संरक्षणात्मक शालेय वातावरण निर्माण करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या माहितीपूर्ण सत्रामुळे शिक्षकांमध्ये बाल संरक्षणाविषयी जागरूकता वाढली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. प्रत्येक विद्यार्थ्यास सुरक्षित, संरक्षित व पोषक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या शाळेच्या वचनबद्धतेला या कार्यशाळेमुळे अधिक बळ मिळाले.

# जंतर-मंतरवरील घटनेच्या निषेधार्थ वाडीत भव्य सर्वपक्षीय शांती कॅण्डल मार्च

### विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, संविधानाचा सन्मान राखावा; देशभक्तीच्या घोषणांनी वाडी दुमदुमली

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा, नीट पेपरफुटी प्रकरणातील विद्यार्थ्यांवरील कथित अन्यायाचा निषेध आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळावा, या मागण्यांसाठी रविवारी वाडीत आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय मोर्चाचे रूपांतर सामाजिक सलोखा आणि शांततेचा संदेश देणाऱ्या भव्य शांती कॅण्डल मार्चमध्ये करण्यात आले. सोशल मीडियावर प्रसिद्ध झालेल्या एका पोस्टच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.




रविवारी सकाळी ११ वाजता वाडी-अमरावती महामार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक तसेच भारतीय संविधानाच्या प्रतीचे माल्यार्पण करून अभिवादनाने झाली.

प्रास्ताविकात सामाजिक कार्यकर्ते विजय वानखेडे यांनी दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनाची पार्श्वभूमी स्पष्ट करत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारने संवेदनशील भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणात पूजनीय भंते संघकिर्ती यांनी हा शांती मार्च केंद्र सरकारच्या धोरणांविरोधातील शांततापूर्ण लोकशाही मार्गाने नोंदवलेला निषेध असल्याचे सांगत संविधानिक मूल्ये जपण्याचे आवाहन केले.

यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने निघालेला शांती कॅण्डल मार्च अमरावती महामार्गावरून खडगाव मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पोहोचला. तेथे शिवरायांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मृत्यू झाल्याचे सांगितल्या जाणाऱ्या विद्यार्थ्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राष्ट्रगीताने या शांती मार्चची सांगता झाली.

या मार्चदरम्यान कोणत्याही राजकीय पक्षाचे झेंडे किंवा विशिष्ट नेत्यांच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या नाहीत. "इन्कलाब जिंदाबाद", "भारत माता की जय", "वंदे मातरम्", "भारतीय संविधानाचा विजय असो" अशा देशभक्तीपर आणि संविधानवादी घोषणांनी संपूर्ण वाडी परिसर दुमदुमून गेला.

वाडी विकास संघर्ष आघाडीच्या पुढाकाराने आयोजित या सर्वपक्षीय शांती कॅण्डल मार्चमध्ये काँग्रेस, बहुजन रिपब्लिकन एकता मंच, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे, बहुजन समाज पार्टी, आझाद समाज पार्टी, बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी, युवा ग्रॅज्युएट फोरम, सपनेश्वर शिव मंदिर कमिटी, अस्मिता मंच, सामाजिक समता मंच, बौद्ध विहार महिला मंडळ, भजनी मंडळ तसेच विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून वाडी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

या शांती कॅण्डल मार्चने विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या मागणीला पाठिंबा देतानाच सामाजिक ऐक्य, संविधाननिष्ठा आणि लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्याचा प्रभावी संदेश दिला.

थोडक्यात

## न्यू एरा हॉस्पिटलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



### नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे यांचीही उपस्थिती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

रामदासपेठ येथील न्यू एरा हॉस्पिटलचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज सायंकाळी झाले. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. पगारिया समूह आणि प्रेमजी इन्व्हेस्ट यांच्या पाठबळावर उभारलेली ही आरोग्यसंस्था आहे. उत्कृष्ट वैद्यकीय सेवा, नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि रुग्णांविषयी करुणाभाव या तत्त्वांवर आधारित न्यू एरा हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर आणि जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एकाच छताखाली सर्वसमावेशक, रुग्णकेंद्रित आरोग्यसेवा देण्याच्या उद्देशाने हे रुग्णालय उभारण्यात आले असून, प्रगत निदान सेवा, अतिदक्षता विभाग, आपत्कालीन सेवा, अवयव प्रत्यारोपण, न्यूरोसायन्सेस, माता व बाल आरोग्य सेवा, रोबोटिक शस्त्रक्रिया तसेच विविध सुपर स्पेशालिटी सेवा येथे उपलब्ध असतील. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी येथील आरोग्य सुविधांची पाहणी करून रुग्णालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या रुग्णालयाच्या माध्यमातून प्रदेशातील दर्जेदार आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणासाठी करण्यात येत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. या उद्घाटन सोहळ्याला नामवंत डॉक्टर, आरोग्य क्षेत्रातील नेते, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. आरोग्यसेवा, वैद्यकीय नवोपक्रम आणि संस्थात्मक उत्कृष्टतेसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवर वैद्यकीय तज्ज्ञ आणि धोरणात्मक भागीदारांचा याप्रसंगी गौरव करण्यात आला. यामध्ये पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, डॉ. निधीश मिश्रा, डॉ. निलेश अग्रवाल, डॉ. राहुल सक्सेना, डॉ. आनंद भुतडा, डॉ. अतिश बाकणे, डॉ. अलंकार रामटेके यांच्यासह अन्य मान्यवरांचा समावेश होता.

## विद्यासागर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने वृक्षारोपण कार्यक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी(बिजेवाडा) रामटेक येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या ५० वृक्षांचे रोपण करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ग्रीन ऑर्गानिक पार्क, नागपूर अध्यक्षा सना पंडीत या होत्या. तसेच ग्रीन ऑर्गानिक पार्क, नागपूर पदाधिकारी रवींद्र संघपाल यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर होते. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. सावन धर्मपूरीवार यांचीही विशेष उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्या सना पंडित यांनी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. प्राचार्य डॉ. सुरेश सोमकुवर यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन करत वृक्षारोपण ही केवळ एकदिवसीय मोहीम नसून ती सातत्याने राबविण्याची जबाबदारी असल्याचे सांगितले.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सतीश महल्ले व डॉ. ज्योती कवठे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. वृक्षारोपणानंतर सर्वांनी लावलेल्या वृक्षांचे नियमित संगोपन करण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास तसेच महाविद्यालय परिसर अधिक हिरवागार करण्यास निश्चितच हातभार लागेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# नागपूर शहराच्या सुनियोजित विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही!

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सफाई कामगारांसह ५७९ उमेदवारांना नियुक्तीपत्रांचे वाटप, आपली बससाठी व्हॉटसअप तिकीट प्रणालीचा शुभारंभ



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक बँकेच्या अहवालानुसार येत्या दहा वर्षात नागपूर शहर जलदगतीने विकसित होत असून पायाभूत सुविधांच्या विकासामुळे शहराचा चेहरा बदलत आहे. एक वैश्विक शहर नवी ओळख निर्माण होत असल्यामुळे शहराच्या सुनियोजित विकासासाठी निधी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महानगरपालिकेच्या हिरवळीवर आयोजित विशेष समारंभात शहरातील ४७६ सफाई कामगारांना कायम नियुक्तीपत्र तसेच सरळसेवा भरतीने १०३ युवकांना नियुक्तीपत्राचे वाटप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी होते.

यावेळी राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नीता ठाकरे, आमदार सर्वश्री मोहन मते, कृष्णा खोपडे, उपमहापौर लिलाताई हाथीबेड, राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष शेरसिंह डागोर, स्थायी समितीच्या अध्यक्षा शिवानी दाणी, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त मुरगनाथन एम., श्री. अंकित आदी अधिकारी तसेच विविध समित्यांचे सभापती, पदाधिकारी व नगरसेवक यावेळी उपस्थित होते.

शहर स्वच्छ व सुंदर राहिल्यास त्याचा सार्वजनिक आरोग्यावरही परिणाम होत असल्यामुळे स्वच्छतादुतांची आस्थापना खर्च जास्त असल्यामुळे नियुक्तीसाठी विशेष सूट देण्यात आल्यामुळे मोठ्या प्रमाणात भरती झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार ४७६ स्वच्छतादूतांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहेत. या समितीने सेवाविषयक बाबींचा अहवालानुसार शासन निर्णय निघुनही भरती होत नव्हती. या अहवालाच्या अंमलबजावणीला प्राधान्य दिल्यामुळे सफाई कामगारांचे विविध प्रश्न सोडविण्यात आल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

स्वच्छता कर्मचाऱ्यांना नागपूर महानगरपालिकेने नियुक्तीपत्रे देण्यासोबतच त्यांच्यासाठी मोफत घरकुल देण्याची योजना राज्यात सर्वात प्रथम राबविली आहे. ३०० चौरस फुटांच्या मोफत घरांसोबतच अधिकच्या बांधकामासाठी अतिरिक्त शुल्क भरल्यास मोठे घर देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे यावेळी सांगताना मुख्यमंत्री म्हणाले की, शहर स्वच्छ राहावे, आरोग्य चांगले राहावे यासोबतच स्वच्छता दुतांच्या जीवनात परिवर्तन सुद्धा घडविण्यासाठी विशेष योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी जाहिर केले.

नागपूर शहराचा वेगाने होत असलेला विकास व त्यासोबतच पायाभूत सुविधा, उंच इमारती यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेऊन महानगरपालिकेने स्वच्छतेच्या दृष्टीने प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी सफाई कामगारांच्य पाल्यांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

महानगरपालिकेच्या ऐतिहासिक हिरवळीवर राष्ट्रपतींसह अनेक मान्यवर व कलावंतांचे सत्कार समारंभ येथे आयोजित करण्यात आले आहेत. ही हिरवळ म्हणजे महानगरपालिकेच्या इतिहासाची साक्ष आहे. महापौर म्हणून व त्यापूर्वीही अनेक समारंभांना उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा कार्यक्रम हिरवळीवरच आयोजित करावा अशी सुचना केली होती. त्याअनुषंगाने या कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याचे तसेच येथील कार्यक्रमांच्या स्मृतींना यावेळी मुख्यमंत्र्यांनी उजाळा दिला.

अध्यक्षीय भाषणात केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, शहराच्या विकासासोबतच स्वच्छता, खेळाचे मैदान व नागरिकांसाठी मुलभूत सुविधांचा विकास करताना येथील स्वच्छतेला प्राधान्य देण्याची आवश्यकता व्यक्त केली. नवनियुक्त कर्मचाऱ्यांना पारदर्शक व गतीमान प्रशासन देण्याची आवश्यकता व्यक्त करताना प्रत्येक प्रभागामध्ये खेळाची मैदाने २४ तास पाणीपुरवठा तसेच बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाला प्राधान्य द्यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

प्रारंभी महापौर नीता ठाकरे यांनी स्वागत करून प्रास्ताविकामध्ये शहराच्या स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छतादुतांच्या नियुक्त्यांसाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले. आपली बस ही सेवा अधिक लोकाभिमुख व्हावी याहृष्टीने व्हॉटसअपद्वारे बसचे तिकिट देण्याचा शुभारंभ होत असल्यामुळे शहर अधिक स्मार्ट होणार असून स्वच्छता कर्माचाऱ्यांसाठी घरकुल योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आभार उपमहापौर लिना हाथीबेड यांनी मानले.

# पैसे नाही म्हणून शस्त्रक्रिया थांबणार नाही : मुख्यमंत्री




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

आजार कितीही गंभीर आणि मोठा असला तरी केवळ पैसे नाही म्हणून गरिबांचे उपचार थांबू नये, यासाठी राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून आवश्यक निधी उपलब्ध केला आहे. येथे आयोजित महाआरोग्य शिबिर हे गरीब रुग्णांसाठी एक वरदान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्षातर्फे धनवटे नॅशनल कॉलेजच्या प्रांगणात आयोजित महाआरोग्य शिबिरात आज मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार अजित गोपछडे, आमदार सर्वश्री. प्रवीण दटके, संजय भेंडे, मोहन मते,राजीव पोतदार, महापौर नीता ठाकरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

समाजातील शेवटच्या घटकाला आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्या हाच या शिबिराचा उद्देश असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वांना आरोग्य सुविधा मिळाव्या यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय राज्य शासनाने घेतले. रुग्णालयांची संख्या वाढवली. राज्य सरकारच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेत यापूर्वी जे गंभीर आजार नव्हते, ते समाविष्ट केले. गेल्या दीड वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे ५७ हजार रुग्णांना ४५२ कोटी रुपये उपचारांसाठी उपलब्ध करून दिले. सर्व धमार्दाय रुग्णालयातील खाटा गरिब रुग्णांसाठी राखीव असल्या पाहिजे, यासाठी डिजिटल पद्धती निर्माण केली.जवळपास १० आजार असे आहेत की जे योजनेच्या ५ लाख रुपयांच्या मयार्देत बसू शकत नाही, त्यामुळे त्यासाठी ९ लाखांपर्यंत, तर काही आजारांच्या बाबतीत ३५ लाख रुपयांपर्यंत मदत करण्याचे शासनाचे धोरण असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

ऐकू न आल्यामुळे बोलता न येणाऱ्या मुलांची समस्या लक्षात घेता लहान मुलांसाठी कॉकलीयर इम्प्लांट शस्त्रक्रिया निःशुल्क सुरु केल्या. त्यामुळे ही मुले ऐकू शकतील व बोलूही शकतील. पुढच्या पिढीत कोणीही मूक- बधिर असणार नाही, यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. दिव्यांग बांधवांना येत्या ९ ऑगस्ट रोजी कृत्रिम पाय-हात यांचे वितरण केले जाणार आहे. सेवा हाच आमचा धर्म आहे. त्यामुळे गरिबातल्या गरीब माणसाला मदत करून समाज निरोगी होण्याच्यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून गोरगरीबांची सेवा होत असल्याची भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. कॅंसरवरील काही कॅप्सुल, इंजेक्शन यांचा खर्च प्रचंड आहे. तो कमी करण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने प्रयत्न करावे, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली.

प्रारंभी माजी आमदार संदीप जोशी यांनी प्रास्ताविकात या शिबिरामागची भूमिका सांगितली. १५ ते २२ जुलै या काळात शहरात विविध ठिकाणी आयोजित शिबिरांमध्ये ३१ हजार रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील साडे चार हजार रुग्णांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती जोशी यांनी यावेळी दिली.

तत्पूर्वी, फिरता दवाखाना, रुग्णवाहिका यांचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यानंतर दिव्यांग बांधवांना यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते व्हील चेअरचे वितरण करण्यात आले. अनेक संस्थांतर्फे यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच गंगाधरराव फडणवीस स्मृती डायग्नोस्टिक सेंटरला देणगी आणि रुग्णवाहिका प्रदान करण्यात आली. हे सर्व दाते तसेच महाशिबिराच्या आयोजनात सहभागी डॉक्टरांचा सत्कार यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. आभार शिबिराचे सहसंयोजक नगरसेवक रितेश गावंडे यांनी मानले. कायर्क्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## गंभीर आजारांवरील उपचारांसाठी निधी, हजारो रुग्णांनी घेतला 'महाआरोग्य शिबिरा'चा लाभ

दरम्यान या महाआरोग्य शिबिरात ह्रदयरोग, त्वचा, कर्करोग, रींग, आकस्मिक विभाग, नेत्र, ईएनटी, यासह अनेक आजारांची तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत करण्यात आली. नागपूर शहर तसेच जिल्ह्यातून आलेल्या हजारो रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेतला. या रुग्णांना औषधे निःशुल्क देण्यात आली तसेच त्यांच्या विविध चाचण्या आणि शस्त्रक्रियांसह अन्य उपचारांची व्यवस्थाही आयोजकांतर्फे निःशुल्क करण्यात आली.

## रोगमुक्त आणि प्रमाणित संत्रा रोपांची उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर द्या : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

### काटोल तालुक्यातील संत्रा-मोसंबी नर्सरीस भेट देऊन पाहणी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी रोगमुक्त आणि प्रमाणित संत्रा रोपांची उपलब्धता महत्त्वाची आहे. संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना उच्च दर्जेदार आणि रोगमुक्त कलमे मिळण्याच्या दृष्टीने नर्सरी व्यवस्थापनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. काटोल तालुक्यातील हातला येथील ग्रीन व्हॅली नर्सरीस जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी नुकतीच भेट देऊन पाहणी केली. ग्रीन व्हॅली नर्सरीचे संचालक अखिल जुनघरे यांच्याशी त्यांनी चर्चा केली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र मनोहरे, प्रकल्प संचालक (आत्मा) अर्चना कडू, उपविभागीय कृषी अधिकारी बळीराम सातपुते, तालुका कृषी अधिकारी जयंत कौटकर, मंडळ कृषी अधिकारी नरेंद्र बांबल आणि क्षेत्रीय अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

संत्रा पिकावरील विविध किडी व रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सुरुवातीपासूनच निरोगी आणि सशक्त कलमांची निर्मिती करणे अत्यंत गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून संत्रा नर्सरीमध्ये हायटेक ग्रीनहाऊस, सॉईललेस मीडिया (मातीविरहित माध्यम) आणि शेडनेट तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे तसेच दर्जेदार कलमांची निर्मिती करून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी व झाडांचे आयुष्य टिकवून ठेवण्यासाठी रोगमुक्त आणि प्रमाणित रोपांची उपलब्धता सुनिश्चित करणे, यावर भर देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या. गुणवत्तापूर्ण संत्रा कलमे उत्पादनाकरीता कृषि विद्यापीठ आणि प्रगतशील संत्रा नर्सरीधारक शेतकऱ्यासोबत चर्चा करून एसओपी (मार्गदर्शक तत्वे) निश्चित करण्याबाबत त्यांनी कृषि विभागास निर्देश दिले. या भेटी दरम्यान ग्रीन व्हैली नर्सरी यांचे माध्यमातून सुरु असलेल्या संत्रा प्रतवारी आणि हाताळणी युनिट, कोल्ड स्टोरेज युनिटची जिल्हाधिकारी यांनी पाहणी करून त्यांचे मार्फत सुरु असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

# सराईत टोळीप्रमुखासह दोघे सहा महिन्यांसाठी तडीपार

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खापरखेडा शहर परिसरातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी खापरखेडा पोलिसांनी निर्णायक पाऊल उचलत सराईत टोळीप्रमुखासह दोन गुन्हेगारांना नागपूर शहर व नागपूर ग्रामीण जिल्ह्याच्या हद्दीतून सहा महिन्यांसाठी तडीपार केले आहे. वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही गुन्हेगारी प्रवृत्ती कायम राहिल्याने ही कठोर कारवाई करण्यात आली असून, परिसरातील शांतता व कायदा-सुव्यवस्था कायम राखण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा निर्णय मानला जात आहे.

तडीपार करण्यात आलेल्यांमध्ये सुरज कन्हैयालाल कावळे (वय २५) हा टोळीप्रमुख आणि शुभम अशोक उईके (वय २५) हा टोळी सदस्य यांचा समावेश आहे. दोघेही खापरखेडा येथील वार्ड क्रमांक २ मधील रहिवासी आहेत.

पोलीस नोंदीनुसार, या दोघांविरुद्ध खुनाचा प्रयत्न, शरीराविरुद्धचे व मालमत्तेविरुद्धचे गंभीर गुन्हे, बेकायदेशीर शस्त्र व अग्निशस्त्र बाळगणे, नागरिकांना धमकावणे, अश्लील शिवीगाळ करून दहशत निर्माण करणे अशा स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांच्या गुन्हेगारी कारवायांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई केली, मात्र त्याचा कोणताही परिणाम न झाल्याने त्यांनी गुन्हेगारी कृत्ये सुरूच ठेवली.

यामुळे खापरखेडा शहर पोलीस ठाण्याने दोघांविरुद्ध तडीपारचा प्रस्ताव तयार करून पोलीस उपआयुक्त (परिमंडळ क्र. ६) डॉ. संदीप पखाले यांच्याकडे सादर केला. प्रस्तावातील पुरावे व गुन्हेगारी इतिहासाची पडताळणी केल्यानंतर हद्दपार आदेश क्र. १०/२०२६, दि. २०



जुलै २०२६ अन्वये दोन्ही आरोपींना सहा महिन्यांसाठी नागपूर शहर व नागपूर ग्रामीणच्या हद्दीतून तडीपार करण्यात आले. ही कारवाई पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रादेशिक विभाग)



विनीता साहू, पोलीस उपआयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ क्र. ६) डॉ. संदीप पखाले तसेच कामठी विभागाचे सहायक पोलीस आयुक्त अंकुश खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली खापरखेडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरीष रूमकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. खापरखेडा शहर पोलीस ठाण्याने अलीकडच्या काळात सराईत गुन्हेगारांविरुद्ध तडीपार, प्रतिबंधात्मक कारवाई आणि विशेष मोहिमांद्वारे गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यास सुरुवात केली असून, कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांविरुद्ध पुढेही अशाच कठोर कारवाया सुरू राहतील, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

थोडक्यात

## दादालोरा खिडकी योजनेअंतर्गत गलाटोला येथे भव्य रोगनिदान शिबिर

### १५० हून अधिक ग्रामस्थांनी घेतला मोफत आरोग्य तपासणीचा लाभ



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**

गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील ग्रामपंचायत पिपरिया अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, गलाटोला येथे दादालोरा खिडकी योजनेअंतर्गत पिपरिया पोलीस कॅम्पच्या वतीने भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १५० हून अधिक महिला, पुरुष व बालकांनी मोफत आरोग्य तपासणी करून लाभ घेतला. गोंदिया जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात आरोग्य विभागाच्या पथकाने ग्रामस्थांची मोफत तपासणी केली. यावेळी डॉ. नेपाळसिंग बघेले, डॉ. भूपेश कुमार भलावी, डॉ. पायल ठाकरे, डॉ. धनश्री जाधव, रीना बहेकार तसेच सोपान जामदाड यांनी वैद्यकीय सेवा दिल्या.

कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक सागर चौहान प्रमुख उपस्थित होते. तसेच पोलीस उपनिरीक्षक आनंद निचितकर, पोलीस अंमलदार राजेश मडावी, पोलीस कर्मचारी विकास माने, चेतन देवकर, सीआरपीएफचे जवान, राजेश कांबळे, शाळेतील शिक्षक-शिक्षिका तसेच आशा सेविका सरिता मानकर यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. शिबिरात रक्तदाब, मधुमेह (शुगर), गर्भवती महिलांची विशेष आरोग्य तपासणी तसेच विविध आजारांची तपासणी करण्यात आली. उपस्थित नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यविषयक मार्गदर्शन व आवश्यक सल्लाही देण्यात आला. शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दादालोरा खिडकी योजनेअंतर्गत अशा जनहिताच्या आरोग्य शिबिरांचे नियमित आयोजन करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी यावेळी केली.

## प्रभाग क्रमांक १४ येथे आयुष्यमान कार्ड शिबिराचे आयोजन

### नगरसेवक राज उईके यांच्या शिबिरात नगराध्यक्ष हेमलता मनोज सावजी यांची भेट



**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**

प्रभाग क्रमांक १४, महादुला नगरपंचायतचे तरुण नगरसेवक राज उईके यांनी आज अनाथपिंडक बुद्ध विहारचे मागे नगरसेविक सोनुताई उघडे यांच्या घरी आयुष्यमान कार्ड/आभा कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महादुला नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ हेमलता मनोज सावजी, नगरसेविक सोनुताई उघडे, नगरसेविका नंदा तुरक, सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक मनोज (ठाकूर) सावजी, नगरसेवक प्रीतम लोहसारवा, भाजप गटनेते अभिजित ढेंगरे, स्वाती पटले, भाजपाध्यक्ष महादूला शहर सचिन पाटील, समाजसेवक मिलिंद गाडेकर, बूथ प्रमुख महेंद्र नेवारे, बूथ प्रमुख बाबुराव सोनवणे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रभाग क्रमांक १४अतिशय गरीब, कॉन्ट्रेटी कामगारांचा वॉर्ड आहे, येथे मोठ्याप्रमाणात कष्टकरी, आदिवासी, दलीत नागरिक राहतात यांना शासनाच्या सोई सवलती, मिळाल्या पाहिजेत त्याच्या कडे घरातील कोणी कमावता व्यक्तीला दुर्धर आजाराने ग्रासले असल्यास पैशाशी जुळवाजुळव करणे गरीब व्यक्तीला शक्य होत नाही अश्या वेळेस आपल्याकडे आयुष्यमान कार्ड/आभा कार्ड महात्मा फुले आरोग्य योजनेचे कार्ड असणे खूपच आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाने अनेक खाजगी हॉस्पिटल देखील या योजनेशी संलग्न केलेली आहेत.

मुख्यमंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री, महसूलमंत्री हे देखील कुणीही गरीब व्यक्तीला कोणताही आरोग्याशी संबंधित दुर्धर आजार असू देत त्याला तत्काळ शासन संलग्न असलेल्या खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार विनामूल्य होणार आहे त्यामुळे कामगार वस्तीतील प्रत्येकाने आयुष्यमान कार्ड काढणे क्रमप्राप्त आहे असे हेमलता मनोज सावजी नगराध्यक्षांनी या प्रसंगी लोकांना मार्गदर्शन करतांनी उद्बबोधन केले. या कार्यक्रमाला सागर मडावी, बूथप्रमुख कृष्णा उघडे, बूथ प्रमुख पराग पाटील, तसेच प्रभागातील अनेक युवक आणि महिला भगिनींनी सहकार्य केले. या आयुष्यमान शिबिरात १५०नागरिकांचे आयुष्यमान कार्ड काढून सुरू करण्यात आले.

## कॉमनवेल्थमध्ये मिराबाईचे सलग तिसरे सुवर्ण

**ग्लासगो :** येथील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या चौथ्या दिवशी भारताची ऑलिम्पिक पदकविजेती वेटलिफ्टर मीराबाई चानू हिने सलग तिसरे सुवर्णपदक पटकावत नवा इतिहास रचला. मीराबाईने यापूर्वी २०१८ (गोल्ड कोस्ट) आणि २०२२ (बर्मिंगहॅम) राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदके जिंकली होती. आता ग्लासगोमध्येही तिने सलग तिसरे सुवर्ण जिंकत या स्पर्धेतील आपला दबदबा कायम राखला आहे. यंदाच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचे हे तिसरे पदक, तर पहिले सुवर्णपदक ठरले. अपेक्षेप्रमाणे मीराबाईने भारताच्या सुवर्णपदकाचे खाते उघडले.

स्नॅच प्रकारात मीराबाईने ८२ किलो वजनाने सुरुवात केली. पहिल्या प्रयत्नात ती अपयशी ठरली. मात्र, दुसऱ्या प्रयत्नात तिने यशस्वीरीत्या ८२ किलो वजन उचलले. त्यानंतर तिसऱ्या प्रयत्नात ८५ किलो वजन उचलत स्नॅच प्रकारात नवा राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा विक्रम प्रस्थापित केला आणि अव्वल स्थान मजबूत केले. क्लीन अँण्ड जर्कमध्ये १०५ किलो वजनासह सुरुवात करताना ती पहिल्या प्रयत्नात अपयशी ठरली. पण दुसऱ्या प्रयत्नात तिने हा निर्णयही सार्थ ठरवत सलग तिसऱ्या सुवर्ण पदकावर नाव कोरले.

# उमरेड नगर परिषद प्रशासनाला नगरसेवकांचा सवाल;

## "तीन वर्षे निधी नाही तर नागरिकांच्या समस्या सोडवणार कोण?"

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
**मनिष शिंगणे**





उमरेड शहरातील रस्ते, नाल्या आणि (गट्टू) यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांच्या कामांसाठी पुढील तीन वर्षांपर्यंत निधी उपलब्ध होणार नसल्याची माहिती नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. कुलभूषण रामटेके यांनी सर्वसाधारण सभेत दिल्याचा दावा गटनेते विशाल देशमुख यांनी केला. शहरातील चोकअप झालेल्या नाल्यांचा प्रश्न मांडताना त्यांनी ही बाब सभागृहासमोर मांडली.

या पार्श्वभूमीवर नगर परिषदेच्या कार्यपद्धतीवर सर्व सामान्य नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "रस्ते, नाल्या आणि गटारांची कामेच होणार नसतील तर नगर परिषदेचे काम नेमके काय?" असा थेट सवाल रमेश भिवापूरकर यांनी उपस्थित केला.

नगरसेविका स्मरणिका राहाटे यांनीही शहरातील पासोडी परिसरातील खराब रस्ते, तुंबलेल्या नाल्या आणि अस्वच्छ परिसरातील समस्या मांडत प्रशासनावर टीका केली. "नगर परिषद या मूलभूत समस्या सोडवू शकत नसेल, तर नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा?" असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित समाधान शिबिरात मुख्याधिकाऱ्यांनी दररोज सकाळी दोन तास शहरातील रस्ते, नाल्या, पथदिवे आणि इतर नागरी समस्या प्रत्यक्ष पाहण्याच्या सूचना देण्यात आल्याची चर्चा आहे. मात्र प्रत्यक्षात शहरातील अनेक भागांत समस्या कायम असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

शहरातील काही रस्त्यांवर नागरिकांकडून निषेध म्हणून बेशरमाची झाडे लावल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. या व्हिडिओंमध्ये नागरिक नगर परिषदेच्या कामकाजावर तीव्र टीका करताना दिसत असून, शहरातील नागरी सुविधांबाबत प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. शहरात अनेक भागात नाल्या खुल्या करून त्यावर झाकण उखडे करून ठेवलेले आहे त्यामुळे मच्छर मोठ्याप्रमाणावर वाढलेले आहे नागरिकांना वेगवेगळ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे पावसाळा सुरू असल्यामुळे सगळीकडे यामुळे दुर्गंधी पसरलेली असल्याचे सांगण्यात येते नगर परिषद प्रशासनाने ही गंभीर समस्या सोडवावी असे शालिनी राऊत यांनी सांगितले.

दुसरीकडे, भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून संपूर्ण उमरेड शहरासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने गटार योजनेला मंजुरी मिळणार असल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र, नागरिकांचा प्रश्न असा आहे की, तोपर्यंत रस्ते, नाल्या आणि स्वच्छतेच्या दैनंदिन समस्या कोण सोडवणार?

गांगापूर इतगारु परिसरातील जनक घराडे यांच्या घराजवळील नाली बुजलेली आहे आणि अरुंद झालेली आहे नगरसेवक रोशन गेडाम यांनी मागील सहा महिन्यापासून याबद्दल नगर परिषद प्रशासनाकडे लेखी पाठपुरवठा करून सुद्धा समस्या कायम असल्याचे सांगितले आहे.

शहरातील मूलभूत नागरी सुविधा सुरळीत ठेवण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने तातडीने ठोस कृती आराखडा जाहीर करावा, अशी मागणी वनश्री रेस्टॉरंटच्या मागच्या परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## २२ वर्षांच्या अथक संघर्षाचे फलित असलेल्या कारगिल स्मारकात २७ वा कारगिल विजय दिवस उत्साहात, संस्थापक उदय धकाते यांच्या कार्याचा गौरव

**दै. सिंहवाणी वृत्त, गडचिरोली**

कारगिल युद्धात मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शहीद वीर जवानांच्या शौर्य, पराक्रम आणि त्यागाला अभिवादन करण्यासाठी गडचिरोली येथे २७ वा कारगिल विजय दिवस देशभक्तीपूर्ण वातावरणात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. कारगिल चौक दुर्गा उत्सव मंडळ, कारगिल स्मारक समिती आणि माजी सैनिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात जिल्हाभरातील नागरिक, माजी सैनिक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यंदाच्या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे कारगिल स्मारक समितीचे संस्थापक उदय धकाते यांच्या गेल्या २२ वर्षांच्या अथक संघर्षाचा सर्व मान्यवरांनी गौरवपूर्वक उल्लेख केला. गडचिरोली शहरात कारगिल स्मारक उभारण्यासाठी सन २००० पासून शासनदरबारी सातत्याने पाठपुरावा, पायपीट आणि संघर्ष करणाऱ्या उदय धकाते यांच्या प्रयत्नांमुळेच २०२२ मध्ये हे स्मारक साकार झाल्याचे वक्त्यांनी नमूद केले. जिल्ह्यात देशभक्तीचे प्रेरणास्थान ठरलेल्या या स्मारकामुळे शहीद जवानांच्या स्मृती कायम जतन झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.



कार्यक्रमाची सुरुवात सकाळी इंदिरा गांधी चौकातून माजी सैनिकांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या कारगिल विजय रॅलीने झाली. रॅलीत शालेय विद्यार्थी, युवक, नागरिक तसेच आमदार डॉ. मिलिंद नरोटे सहभागी झाले. कारगिल चौकातील शहीद स्मारकावर पोहोचल्यानंतर मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना अभिवादन केले. यानंतर आयोजित मुख्य कार्यक्रमात वीरमाता, वीरपिता, वीरपत्नी, गुणवंत पाल्य आणि विविध पुरस्कारप्राप्त माजी सैनिकांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी आमदार डॉ. मिलिंद नरोटे, माजी खासदार डॉ. अशोक नेते, लेफ्टनंट कर्नल रामनाथ स्वामी, कारगिल स्मारक समितीचे संस्थापक उदय धकाते, लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे वरिष्ठ महाव्यवस्थापक कृष्णा रेड्डी, नगराध्यक्ष प्रणोती निंबोरकर, माजी नगराध्यक्षा योगिता पिपरे,विरपत्नी श्रीमती चंदनखेडे,व्यापारी संघटनेचे घिसूलाल काब्रा, होमराज डोनाळकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सर्व मान्यवरांनी आपल्या मनोगतात उदय धकाते यांनी अथक प्रयत्नामुळे उभारलेले हे कारगिल स्मारक हे केवळ एक स्मारक नसून शहीदांच्या शौर्याची प्रेरणा देणारे राष्ट्रीय स्मृतिस्थळ असल्याचे सांगत, भावी पिढीमध्ये देशभक्तीची भावना जागृत ठेवण्यासाठी उदय धकाते हे २७ वर्षापासून झटत आहे. अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला विविध सामाजिक, धार्मिक, राजकीय संघटनांचे पदाधिकारी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, माजी सैनिक, महिला, युवक, विद्यार्थी आणि देशभक्त नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश भांडेकर, कालू गोवर्धन, नंदू कुमरे, प्रकाश धकाते, मोबीन सय्यद, सुचिता धकाते,वनिता भांडेकर,महेंद्र मसराम, रुपेश सलामे, बाळू मोटघरे, वैभव रामटेके, राजू डोंगरे, सुचिता कामडी, प्रा. सुनीता साळवे, वनिता धकाते, स्मिता दुधे, प्रमिला कुंभारे, प्रा. पारखी, माधुरी दहिकर, अंजली कुळमेथे, हरबा मोरे,श्रीकांत पतरंगे, अनिल पोहणकर, चंद्रशेखर भडांगे, ऋषी वंजारी (से.नि.), हवालदार डिसेज वालदे (नि.), हवालदार महादेव वासेकर (नि.), हवालदार विनायक गेडाम (नि.) राजू भांडेकर, (नि.) विठ्ठल राऊत (नि.)यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन माजी सैनिक डिसेज वालदे यांनी केले.

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर गोंदियात काँग्रेस कार्यकर्त्यांचा जल्लोष

### घोषणाबाजी, फटाक्यांची आतषबाजी आणि मिठाई वाटून व्यक्त केला आनंद, सत्याग्रह सुरूच राहणार असल्याची अमर वराडे यांची भूमिका



**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरात जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत फटाके फोडले आणि एकमेकांना मिठाई भरवून आनंद व्यक्त केला.

कार्यकर्त्यांनी "कल लढे थे गोरो से, आज लढेंगे चोरो से" तसेच "धर्मेंद्र प्रधान तो झाकी है, नरेंद्र मोदी अभी बाकी है" अशा घोषणा देत शहरातून जल्लोषपूर्ण वातावरण निर्माण केले. त्यानंतर सर्व कार्यकर्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेजवळ पोहोचले. तेथे महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून एकमेकांना मिठाई भरवत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर वराडे यांनी, "देशातील जनतेची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागेपर्यंत काँग्रेसचा सत्याग्रह सुरूच राहील," अशी भूमिका मांडली.

माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनीही माध्यमांशी बोलताना, "देशभरातील युवकांच्या आंदोलनाला यश मिळाले असून राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाने या आंदोलनाला ठाम पाठिंबा दिला होता," असे सांगितले.

या कार्यक्रमाला माजी आमदार गोपालदास अग्रवाल, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर वराडे, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशोक चौधरी, नगराध्यक्ष सचिन शेंडे, नगर परिषद सत्तापक्ष नेते राकेश ठाकूर, नगरसेवक सुनील भालेराव, चंद्रकांत चुटे, विजय रगडे, अजय अग्रवाल, क्रांती जयस्वाल, नगरसेविका ज्योती फुंडे, झहीर भाई अहमद, राजकुमार पटले, रणजीत गणवीर, जीवन शरणागत, विजय बाहेकर, योगेश अग्रवाल, वेंकट पाथरू, राकेश वर्मा, मनीष चव्हाण, अमन तिघाला, मनोज पटनायक, रूपाली उके, विशाखा वासनिक, सुनिता माहुरे, रेवती दगडे, अनुपमा पटले, शीतल गुप्ता, बलजीतसिंग बगा, अर्जुन नागपुरे, अरमान जयस्वाल, कृष्णा कठाणे, पवन ओके, अनिल मानकर, रवी आस्वानी, कशीश चंदिकापुरे, राकेश पाटील, विशाल खरोले, कमलेश पटले यांच्यासह काँग्रेसचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार संजय पुराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

### मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून सालेकसा तालुक्यातील नानव्हा रस्त्याच्या ६.५ कि.मी. कामास प्रशासकीय मंजुरी

**दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया**



गोंदिया जिल्ह्याच्या सालेकसा तालुक्यातील नानव्हा गावाला जोडणाऱ्या सुमारे ६.५ किलोमीटर लांबीच्या महत्त्वाच्या रस्त्याच्या बांधकामाला मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. या मंजुरीमुळे अनेक वर्षांपासून खराब रस्त्यामुळे त्रस्त असलेल्या नानव्हा व परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

हा रस्ता अनेक वर्षांपासून अत्यंत जीर्ण अवस्थेत होता. विशेषतः पावसाळ्यात चिखलामुळे वाहतूक विस्कळीत होत असे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, शेतकऱ्यांना तसेच रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या समस्येची दखल घेत आमदार संजय पुराम यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून या रस्त्याच्या मंजुरीसाठी प्रयत्न केले.

या प्रयत्नांना यश मिळत मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याच्या कामास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. या रस्त्याच्या निर्मितीमुळे नानव्हा परिसरातील सुमारे ८ ते १० गावांतील नागरिकांना थेट लाभ होणार असून वाहतूक अधिक सुलभ, सुरक्षित आणि जलद होणार आहे. तसेच आरोग्य, शिक्षण, शेती व व्यापार क्षेत्रालाही चालना मिळणार आहे.

याबाबत प्रतिक्रिया देताना आमदार संजय पुराम म्हणाले, "नानव्हा रस्ता हा केवळ एका गावाचा नव्हे, तर संपूर्ण परिसराच्या विकासाचा महत्त्वाचा दुवा आहे. या रस्त्यामुळे नागरिकांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण झाली असून ग्रामीण विकासाला गती मिळेल."

दरम्यान, नानव्हा ग्रामपंचायतीचे सरपंच गोरिशंकर बिसेन यांनी आमदार संजय पुराम यांचे आभार मानत सांगितले की, "सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा रस्ता मंजूर झाला असून यामुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ होईल."